दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ५८ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२४ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

### लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी

# डिसेंबरचा हप्ता मिळण्यास सुरुवात
# १५०० जमा होणार; २१०० साठी प्रतीक्षा

**मुंबई (वृत्तसंस्था)–काही दिवसांपूर्वीच अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लवकरच वर्ग करण्यात येणार, अशी माहिती दिली होती. त्यानंतर योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता कधी जमा होणार, या चर्चा गेल्या काही दिवसापासून सुरू आहेत. लाडक्या बहिणींना डिसेंबर महिन्याचा हप्ता मिळणार आहे. हप्ता देण्याची प्रक्रिया आजपासून सुरु करण्यात येणार आहे.विधानसभा निवडणुकीवेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कमेत वाढ करुन २१०० रुपये करणार असल्याचे आश्वासन महायुतीच्या वतीने देण्यात आले होते. त्यामुळे आता सहावा हप्ता २१०० रुपये येणार की १५०० रुपये येणार, अशी चर्चा महिलांमध्ये सुरू होती. दरम्यान, आता सहावा हप्ता हा १५०० रुपये प्रमाणेच येणार असल्याचे सांगितले जात आहे.**



या महिन्यात दोन टप्प्यात महिलांना पैसे मिळणार आहेत. पहिल्या टप्प्यात २ कोटी ३५ लाख महिलांच्या खात्यात १५०० रुपयांप्रमाणे पैसे जमा होणार आहेत. तर निवडणुकीआधी आलेल्या २५ लाख नवीन अर्जाची स्क्रुटिनी सुरू आहे, ती पूर्ण झाल्यानंतर या महिलांच्या खात्यात हप्ता जमा होणार असल्याची माहिती आहे. डिसेंबरच्या हप्त्यासाठी ३५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.दरम्यान, लाडक्या बहीण योजनेच्या पाच हप्त्यांची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्या जमा करण्यात आली आहे. जुलै ते नोव्हेंबर पर्यंत १५०० रुपयांप्रमाणे ७५०० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले होते. निवडणुकीमुळे नोव्हेंबरचा हप्ता ऑक्टोबर महिन्यातच महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला होता. आता डिसेंबरच्या हप्त्याची रक्कम आजपासून महिलांच्या खात्यात येणार आहे.

### २१०० रुपयांसाठी वाट पाहावी लागणार

**लाडक्या बहिणींना २१०० रुपयांसाठी आणखी वाट पाहावी लागणार आहे. योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्याबाबत अर्थसंकल्पात निर्णय घेतला जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर सांगितले होते. त्यानुसार राज्याचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर महिलांना लाडकी बहीण योजनेचा २१०० रुपयांचा मिळू शकेल, अशी स्थिती आहे. दरम्यान, राज्याचा अर्थसंकल्प हा ३ मार्च २०२५ रोजी सादर करणार असल्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले होते. त्यामुळे लाडक्या बहिणींना २१०० रुपयांच्या हप्त्यासाठी मार्च महिन्यापर्यंत वाट पाहावी लागणार आहे.**

## कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही–अजित पवारांचा अधिकाऱ्यांना इशारा

### वित्त व नियोजन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाची घेतली बैठक

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वित्त व नियोजन तसेच राज्य उत्पादन शुल्क मंत्रिपदाचे सूत्र हाती घेताच मंगळवारी दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्या या दोन्ही विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच करसंकलन आणि महसूलवाढीच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याचे निर्देश अजित पवारांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. अधिकाऱ्यांनी पारदर्शक कारभार करावा. करचोरी, करगळती रोखण्याच्या कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देखील अजित पवारांनी दिला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रलंबित योजना, आवश्यक निधी तसेच राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला. मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात वित्त नियोजन विभाग तसेच राज्य उत्पादन शुक्ल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सविस्तर माहिती घेतली आहे. या बैठकीत वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा व इतर अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यासारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना देत राज्याच्या महसूल वाढीसाठी करचोरी, करगळतीसह गैरकारभार रोखण्याच्या सूचना दिल्या.यावेळी अजित पवारांनी करसंकलनाचे उद्दीष्ट गाठण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात येतील परंतु कामात परिस्थितीत हयगय चालणार नसल्याचे सांगत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच राज्यातील बेकायदा दारूविक्रीवर कडक निर्बंध आणण्यासाठी पारदर्शक व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पुढचा महाराष्ट्र कसा असेल याची भीती वाटते:सुप्रिया सुळेंनी केली चिंता व्यक्त

**बारामती (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे या सध्या बारामतीच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्रातील वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करत चिंता व्यक्त केली आहे. तसेच पक्षाची ८ व ९ जानेवारी रोजी मुंबईत बैठक होणार असल्याची देखील त्यांनी माहिती दिली आहे. यात पक्षाची आगामी भूमिका ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, आजवर जे सिनेमात गुन्हेगारीचे चित्र पाहायला मिळायचे ते आता महाराष्ट्रात वास्तवात दिसू लागले आहे. या घटना महाराष्ट्राला शिभणाऱ्या नाही. आता पुढचा महाराष्ट्र कसा असेल अशी भीती मला वाटत आहे, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी



महाराष्ट्राच्या भविष्याची काळजी व्यक्त केली आहे. परभणी येथील घटनेवर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, परभणीतील घटना महाराष्ट्रासाठी अतिशय निंदनीय आहे. अर्थात या ठिकाणी शरद पवार गेल्यानंतर राज्यातील इतर नेते, लोक गेले तोपर्यंत कोणीही त्या ठिकाणी भेट द्यायला गेले नव्हते, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, फक्त पोलिसांची बदली करून चालणार नाही. त्यापेक्षा कोण आरोपी आहे हे शोधले पाहिजे. बीड आणि परभणीमध्ये ज्या घटना झाल्या त्यावर विश्वास बसत नाही. जे सिनेमात पाहिले ते वास्तव महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत आहे. पुढचा महाराष्ट्र कसा असेल अशी भीती वाटत आहे, मला कधीही भीती वाटली नाही पण आता वाटत आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अपेक्षा आहेत, त्यांनी महाराष्ट्राला न्याय द्यावा. सुरेश धस, नमित मुंदडा यांचे कौतुक आहे. करण राजकीय मतभेद बाजूला ठेऊन लढण्याची आज आवश्यकता आहे. मात्र, धनंजय मुंडे यांच्या बाबतीत देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घ्यावा, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुप्रिया सुळे म्हणाल्या, जेव्हा गुन्हेगारी वाढते तेव्हा आर्थिक विकास मंदावतो. केंद्र सरकारचा आजवरचा डेटा देखील हेच सांगतो. महाराष्ट्रात वाढती गुन्हेगारी ही आर्थकारणाला खिळ बसवणारी ठरले असा धोका असल्याचे सुळे म्हणाल्या आहेत. यावेळी त्यांनी मराठी साहित्य संमेलनबद्दल देखील भाष्य केले. त्या म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील साहित्य संमेलनाला येणार आहेत.

## राज्य सरकारची आर्थिक स्थिती डबघाईला:विकास कामे बिल्कुल करू शकणार नाही–अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विविध मुद्द्यांवरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा विभागातील भ्रष्टाचाऱ्यांना सरकारने संरक्षण दिले, असा आरोपही त्यांनी केला. तसेच केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द करावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच राज्य सरकारची आर्थिक स्थिती डबघाईला आली असून ते विकास कामे करू शकणार नाहीत, असेही ते म्हणाले.नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर अंबादास दानवे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी विधानसभेत मराठवाड्याचे कोणकोणते प्रश्न मांडले, याबाबत माहिती देत सरकारवर निशाणा साधला. कमी संख्या असूनही आम्ही चांगल्या पद्धतीने महाराष्ट्राचा आवाज अधिवेशनात उठविण्याचा प्रयत्न केल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. सरकारची नियत फक्त निवडणूक काढणे होती. निवडणुकीला लालूच दाखवलेली आहे. निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणीच्या हप्त्याची रक्कम १५०० वरून २१०० रुपये करण्याची घोषणा केली होती. खरंतर त्यांनी पुरवणी मागण्यांमध्ये १५०० ची २१०० रक्कम करायला पाहिजे होती, असे दानवे म्हणाले. सरकार आता १५०० रुपये देतील. आता याची स्क्रुटिनी करतील. एखाद्याला कोर्टात पाठवतील आणि योजनेची अंमलबजावणी कशी होणार नाही, ते ही बघतील, अशी भीती अंबादास दानवे यांनी व्यक्त केली.

भाजपने लोकसभेत मागील दोन वेळा विरोधी पक्षनेता दिला नव्हता. त्यामुळे महाराष्ट्रतही देतील की नाही, याबाबत शंका आहे. म्हणून आम्ही याबाबत सावध पावले उचलत आहोत. विरोधी पक्षनेता व्हावा ही आमची सगळ्यांची भूमिका असल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले.

कांद्यावर केंद्र सरकारचे निर्यात शुल्क वीस टक्के



आहे. हे शुल्क हटले, तर कांद्याला भाव मिळू शकेल. आताच्या घडीला कांद्याचे भाव साडे तीन हजारांहून १००० रुपयांपर्यंत उतरले आहेत. वेगवेगळ्या राज्यांतून कांद्याची आवक होत आहे. हिवाळी कांदा ओला असल्याने जास्त दिवस टिकत नाही. त्यामुळे सरकारने निर्यात शुल्क लवकरात लवकर रद्द केले, तर शेतकऱ्यांचे हित होईल, अन्यथा शेतकरी देशोधडीला लागतील, अशी टीका अंबादास दानवे यांनी सरकारवर केली.

राज्याच्या क्रीडा विभागातून परस्पर काढले जातात, ही गंभीर बाब आहे. अधिकाऱ्यांना याचा थांगपत्ता नाही, असे होऊ शकत नाही. क्रीडा विभागातच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराचा अड्डा निर्माण झालेला आहे. मागील काळात सुहास पाटील या अधिकाऱ्याचे बरेच वाभाडे बाहेर काढले, परंतु सरकारने त्याला संरक्षण दिले, असा आरोप अंबादास दानवे यांनी केला. आता त्याच्याच अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. सर्व अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याशिवाय असा घोटाळा होऊ शकत नाही, असा दावा अंबादास दानवे यांनी केला. या घोटाळ्याची एसआयटी लावून सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी दानवे यांनी केली.

## पंकजा मुंडे ॲक्शनमोडमध्ये:विभागाच्या अधिकाऱ्यांची घेतली आढावा बैठक

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागातील राबविण्यात येणाऱ्या योजना, भविष्यातील ध्येय धोरणे, घनकचरा व्यवस्थापन, माझी वसुंधरा अभियान, पाणी, हवा प्रदुषण, नदी व तलाव संवर्धन, पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृती उपक्रमांविषयी सुनियोजित आराखडा तयार करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विभागांचा आढावा घेताना दिल्या.

खातेवाटप झाल्यानंतर मंत्रिपदाची जबाबदारी येताच पंकजा मुंडे यांनी आज सह्याद्री अतिथीगृहात पर्यावरण आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की, राज्यातील घनकचरा व्यवस्थापन, पाणी, हवा प्रदूषण नियंत्रण, नदी व तलाव संवर्धन, पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृतीपर उपक्रम, राज्यस्तरीय नदी संवर्धन योजना, सागर तटीय विशेष राखीव क्षेत्र नियमन, स्थानिक स्वराज्य संस्थाचे घनकचरा व्यवस्थापन, प्लॅस्टीक निर्मुलन, राज्य नदी संवर्धन योजना, महाराष्ट्र पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र, सृष्टी मित्र पुरस्कार,



माझी वसुंधरा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे, पर्यावरणपूरक वातावरणासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करणे, जैविक कचरा नियमावली, पर्यावरण जतन व संवर्धनासाठी राज्य, जिल्हा व ग्रामपातळीवर समित्या कार्यरत करणे, पर्यावरण क्लब स्थापन करणे. पाणथळ जागांचे संवर्धन यासाठी विशेष प्रयत्न करणे याबाबत सविस्तर नियोजन करा. त्यानुसार राज्यातील पर्यावरण विभागातील कामांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील असेही त्या म्हणाल्या.

राज्यातील पशुसंवर्धन विभागाचाही यावेळी त्यांनी आढावा घेतला. विभागाची स्थापना आणि वाटचाल विभागाची ध्येय धोरणे, राज्यातील पशुधन, राज्य व केंद्र पुरस्कृत योजना, एकात्मिक सर्वेक्षण योजना पशुगणना, जिल्हा वार्षिक योजना, विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागातील योजनांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे मंत्री पकंजा मुडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी बैठकीला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम, पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. यावेळी उपस्थित अधिकारी यांनी विभागाच्या योजना, सद्यस्थिती व भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर माहितीचे सादरीकरण केले.

## विनोद कांबळीच्या मदतीला धावले एकनाथ शिंदे काही कमी पडू न देण्याचा दिला डॉक्टरांना सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–माजी क्रिकेटर विनोद कांबळी यांची प्रकृती खालावली असून त्यांना भिवंडी येथील आकृती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विनोद कांबळी यांच्यावर उपचार सुरू असले तरी त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. बीसीसीआयच्या पेन्शनवरच त्यांचा खर्च चालतो. त्यामुळे उपचारासाठी एवढा पैसा कुठून उभा करायचा असा प्रश्न त्यांच्या समोर पडला असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मदतीला धावून आले आहेत. शिंदे यांनी विनोद कांबळी यांच्या उपचारासाठी ५ लाख रुपयांची मदत केली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी विनोद कांबळी यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस करत मदत केली आहे. मंगेश चिवटे यांनी डॉक्टरांकडे देखील विनोद कांबळी यांच्या तब्येतीची चौकशी केली आहे. उपचारात कोणतीही गोष्ट कमी राहणार नाही याची काळजी घ्या, अशी विनंती देखील चिवटे यांनी केली आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मदत जाहीर केल्याचे समजल्यावर विनोद कांबळी यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत. तसेच एकदा रुग्णालयात भेटण्यासाठी यावे, अशी विनंती देखील कांबळी यांनी केली आहे. तसेच लवकरच एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे हे विनोद कांबळी यांची भेट घेणार असल्याची देखील माहिती समोर येत आहे.दरम्यान, विनोद कांबळी यांना आता बरे वाटत असल्याचे देखील वृत्त समोर आले आहे. याबाबत विनोद कांबळी यांनीच माहिती दिली होती. मला आता बरे वाटत आहे, असे माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीने मंगळवारी सांगितले. कांबळीने हॉस्पिटलच्या बेडवर 'वी आर द चैंपियन–नो टाइम फॉर लूज' हे गाणे गायले. लोकांना दारू पिऊ नका, तुमच्या घरच्यांना आवडणार नाही, असा सल्ला देखील त्यांनी दिला.२१ डिसेंबर रोजी रात्री उशिरा कांबळीची प्रकृती खालावल्याने त्याला ठाण्याच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# शहरातील अनेक भागांत दूषित पाणीपुरवठा;वारंवार तक्रारी करुनही करमाळा नगरपालिकेचे दुर्लक्ष

**सोलापूर । प्रतिनिधी**

काठोकाठ भरलेले धरण उशाला असताना केवळ नियोजनाच्या अभावामुळे करमाळकरांना नगरपालिकेकडून दोन दिवसां आड पाणीपुरवठा होत आहे. अपुऱ्या दाबाने होणारा हा पाणीपुरवठा खूपच कमी वेळ होत असला तरी सहनशील करमाळकर मिळते तेवढ्या पाण्यात समाधान मानत आहेत. मात्र पाईपलाईन मध्ये असलेल्या बिघाडामुळे शहरातील बऱ्याच ठिकाणी दूषित पाणीपुरवठा होत आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही याची दखल घेतली जात नसल्यामुळे शहरवासिय हतबल झाले आहेत.

दोन दिवसांआड पाणी येत असल्यामुळे नागरिक इतर कामे सोडून नळाला पाणी येण्याची वाट पाहत असतात. पाणी सुटण्याची वेळ सकाळी साडेसात ची असली तरी किमान पाच मिनिटे नगरपालिकेच्या नळ संयोजनातून केवळ हवा येते. त्यानंतर दहा मिनिटांपर्यंत बुडबुडे येत पाणी यायला सुरुवात होते. पंधरा मिनिटे अशीच गेल्यानंतर कुठूनतरी पाणी व्यवस्थित येत आहे असे वाटताच हे पाणी गाळयुक्त, फेसाळ आणि काळे येत असल्याचे लक्षात येते. त्यामुळे परत दहा मिनिटे हे पाणी तसेच सोडून द्यावे लागते. होणारा पाणीपुरवठा हा अपुऱ्या दाबाने असल्याने मोटारी लावल्याशिवाय पाणी भरणे अशक्य असते. मात्र स्वच्छ पाणी यायला सुरुवात झाल्याने मोटर लावेपर्यंत तर महावितरणच्या दैनंदिन नियोजनानुसार विद्युत पुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे नागरिकांना पाणी वाहून भरावे लागते. साडेआठला लाईट आल्यानंतर केवळ दहा ते पंधरा मिनिटेच पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही आणि त्यांना पुन्हा दोन दिवसांनी होणाऱ्या पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागते.

गेल्या दोन वर्षांपासून याच परिस्थितीतून करमाळा शहरवासीय जात असून वारंवार तक्रारी करूनही यात कोणतीही सुधारणा होत नसल्याने शहरवासीयांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. अजून किती दिवस पुरेशा दाबाने आणि पुरेशा वेळेत शुद्ध पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक बाब आहे. मात्र गेल्या कित्येक दिवसांपासून शहरातील अनेक भागात गाळ युक्त, अपुऱ्या दाबाने, फेसाळ आणि काळे पाणी येत आहे. नागरिकांनी याबाबत अनेकदा तक्रारी करूनही नगरपालिकेकडून ठोस उपाययोजना केली जात नाही. नगरपालिकेने लवकरात लवकर पाणीपुरवठ्यात सुधारणा केली नाही तर पाण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सुतार गल्ली आणि दत्तपेठ येथील नागरिकांनी दिला आहे.



**"ठिकठिकाणी बांधकामे चालू असल्याने बऱ्याच ठिकाणी खडी वाळू साचल्याने गटारी तुंबलेल्या आहेत. त्यामुळे कुठून तरी अशुद्ध पाणी पाईपलाईन मध्ये जात आहे. पाणीपुरवठा विभागाकडून हे लिकेज शोधण्याचे काम चालू असून लवकरच शुद्ध पाणीपुरवठा केला जाईल.**
**–कमलेश भोज,**
**कर्मचारी, पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद करमाळा.**

# सरपंच पदाकरीता पाच ग्रा.प.चे आरक्षण निश्चित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासन अधिसूचनेनुसार मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल रिट याचीका ४६७१/२०२३ मध्ये दि. १० ऑक्टोंबर २०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार, दि. ०१ जानेवारी २०२४ ते ४ मार्च २०२५ या कालावधीसाठी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांकरीता सरपंच पदाचे आरक्षण नव्याने निश्चित करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी उपरोक्त कालावधीत असलेल्या निवडणुकांकरीता तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीचे आरक्षण संख्या निश्चित करुन देण्यात आलेली होती.त्यानुसार, चंद्रपूर तालुक्यातील पांढरकवडा, वायगांव मो., पिंपळखुट, गोंडसावरी व चेकनिंबाळा या ५ ग्रामपंचायती करीता संरपच पदाचे आरक्षण सोडत दि. २३ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २ वाजता तहसिल कार्यालय, चंद्रपूर येथे काढण्यात आली.या ग्रामपंचायतीचे आरक्षण निश्चित:संरपच पदाचे आरक्षण सोडतीमध्ये तालुक्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता पिंपळखुट, वायगांव मो., सर्वसाधारण स्त्री करीता गोंडसावरी आणि पांढरकवडा तर सर्वसाधारण प्रवर्गाकरीता चकनिंबाळा या ग्रामपंचायतीचे आरक्षण निश्चीत करण्यात आले आहे.

# ६ जानेवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी आणि अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे आयोजन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. या लोकशाही दिनानिमित्त नागरीक व शेतकरी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल करतात. सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार सादर करतांना विहित नमुन्यातील तक्रार अर्जासोबत तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची प्रत तसेच अर्ज १५ दिवस आधी २ प्रतीत सादर करावा. तक्रार व निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी. तद्नंतरच तक्रार अर्ज स्वीकारण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे

# एम.एम.ए.सभागृहात २७ डिसेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न होणार

**महाड । प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील एम. एम. ए. हॉस्पिटल, एम.आय.डी.सी. महाड आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे भ.क.ल. वालावलकर रुग्णालय यांच्या संयुक्त उपक्रमाने २७ डिसेंबर २०२४ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये सर्जन, अस्थिरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ, जनरल मेडिसिन, नाक कान घसा तज्ञ यांसारख्या अनेक विशेषतज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार आहे. यावेळी हर्निया, अल्सर, अपेंडिक्स, मुतखडा, मुळव्याध, थायरॉईड अशा विविध आजारांवर तपासणी केली जाईल. तपासणीदरम्यान रुग्ण शस्त्रक्रिया करण्यास योग्य आढळल्यास पिवळ्या आणि केशरी रेशन कार्ड असलेल्या रुग्णांसाठी शस्त्रक्रिया मोफत केली जाईल. रुग्णांना शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचे मूळ रेशन कार्ड, ओळखपत्र आणि जुने तपासणी रिपोर्ट घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिर २७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत एम. एम. ए. सभागृह, एम.आय.डी.सी. महाड येथे संपन्न होणार आहे. अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा:
संपर्क: ७३५०००४११५, ७३५०००४७७२, ७३५०००४७७५, ९२२३८५५६२६.

# मधुमक्षिका पालकांना मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ, नवी दिल्ली अंतर्गत मध आणि मधमाशी संबंधित अन्य उत्पादनांच्या योग्य स्त्रोताचा शोध घेण्याच्या दृष्टीने व अद्ययावत नोंदी ठेवण्यासाठी मधुक्रांती पोर्टल विकसित करण्यात आले आहे. https://madhukranti. in/nbb या वेबसाईटवर मधुमक्षिका पालकांनी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी केले आहे.

नोंदणीमुळे मधुमक्षिका पालकांना होणारा लाभ : मधुमक्षिका पालकाला नोंदणीकृत/मान्यताप्राप्त मधुमक्षिकापालक म्हणून ओळख मिळते. नोंदणी धारकांना १ लाखापर्यंत फ्री विमा उपलब्ध होतो. विना अडथळा मधुमक्षिका पेट्यांचे स्थलांतर.


नोंदणीवेळी आवश्यक कागदपत्रे :
आधार कार्ड (नाव, जन्मतारीख, पत्तासहित), आधार क्रमांकाशी जोडलेला अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक, मधुमक्षिका पालनासंबंधित तपशील, मधुमक्षिका पालन प्रशिक्षण प्रमाणपत्राची सॉफ्ट प्रत तसेच मधुमक्षिका पालकाचा मधुमक्षिका पेट्यांसमवेत फोटो आवश्यक राहिल. तसेच लागणारे नोंदणी शुल्क फक्त ऑनलाईन पद्धतीने अदा करता येईल.

स्व:मालकीच्या मधुमक्षिका पेट्यांमधील मधुमक्षिका वसाहतींची संख्या (१० फ्रेम) व भरावयाचे नोंदणी शुल्क :
१० ते १०० फ्रेम करीता रु. २५०, १०१ ते २५० फ्रेम करीता रु. ५००, २५१ ते ५०० फ्रेम करीता रु. १ हजार, ५०१ ते १००० फ्रेम करीता रु. २ हजार, १००१ ते २००० फ्रेम करीता रु. १० हजार, २००१ ते ५००० फ्रेम करीता रु. २५ हजार, ५००१ ते १०,००० फ्रेम करीता रु. १ लक्ष तर १० हजार पेक्षा अधिक फ्रेम करीता रु. २ लक्ष नोंदणी शुल्क भरावयाचे आहे. तरी, जास्तीत जास्त मधुमक्षिकापालकांनी मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी राष्ट्रीय मधमाशी मंडळ, नवी दिल्ली ०११-२३३२५२६५,२३७१९०२५, मधुक्रांती पोर्टल Tech Support-१८००१०२५०२६ तसेच महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे (०२०) २९७०३२२८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# महाड शहरामध्ये चोरट्यांचा धुमाकूळ, पोलीस प्रशासन गाढ झोपेत

**महाड । प्रतिनिधी**

महाड शहरामध्ये चोरट्यांची दहशत सुरूच असून, चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. काही दिवसांपूर्वी किल्ले रायगड रस्त्यावरील साईआशा कॉम्प्लेक्समधील सहा फ्लॅट्स फोडले गेले होते, आणि त्या घटनेचा तपास अद्याप सुरू असताना, २१ डिसेंबर २०२४ रोजी महाड शहरातील नवेनगर भागातील ग्रीनपार्क इमारतीतील दोन फ्लॅट्स फोडले गेल्याची घटना समोर आली आहे. इमारतीतील ए विंगमधील ४०८ नंबर फ्लॅटमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता अभिजीत झेंडे आणि डी विंगमधील २०२ नंबर फ्लॅटमध्ये मंगेश देशमुख यांच्या फ्लॅट्स बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी चोरी केली. घटनेची माहिती मिळताच महाड शहर पोलीस त्वरित



घटनास्थळी दाखल झाले असून तपास सुरू आहे. परंतु, सध्या तपासात चोरट्यांनी किती मोठ्या प्रमाणावर ऐवज लंपास केला आहे हे स्पष्ट झालेले नाही. महाड शहरामध्ये यापूर्वीही चोरीच्या अनेक घटनांना तोंड द्यावे लागले आहे, परंतु पोलिसांसाठी या घटनांचा तपास करणे अजूनही शक्य झालेले नाही. नागरिकांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पोलिस प्रशासनावर सध्या गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत, आणि असा आरोप केला जात आहे की, पोलिस प्रशासन गाढ झोपेत आहे आणि चोरट्यांच्या यशस्वी चोरीला रोखू शकलेले नाही.

# माजी नगरसेविका संगीता खांडेकर यांच्या हस्ते विठ्ठल मंदिर प्रभागात अंडरग्राऊंड नालीचे बांधकाम जोमात

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील विठ्ठल मंदिर प्रभाग क्र. १५ मधील मारपीट चौक येथे अंडरग्राऊंड नालीच्या बांधकामाचे कार्य जोमात सुरू आहे. महानगरपालिकेच्या नगोध्दान निधीतून २५ लाख रुपयांची तरतूद करून, माजी नगरसेविका संगीता खांडेकर यांच्या अथक प्रयत्नांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम शुभारंभ करण्यात आले.

हे अंडरग्राऊंड नाली बांधकाम हनुमान चौक, चनकापूरे यांच्या घरापासून मारपीट चौक, भाग्यलक्ष्मी किराणा पर्यंत तसेच शांताराम गर्गेलवार, मोडकवार ते नागपूरे पर्यंतचे क्षेत्र कव्हर करणार आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील गाळ काढणीसाठी सुविधा मिळणार असून, पावसाळ्यात होणारी जलनिवर्तनाची समस्या सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

संगीता खांडेकर यांच्या प्रयत्नांची दखल घेत, स्थानिक नागरिकांनी त्यांच्या कामाची प्रशंसा केली आहे.

# मोबाईलच्या आहारी गेलेल्या मुलाचे घरातून पलायन;पोलिसांनी मुलाला छत्तीसगडमधून आणले

**नागपूर । प्रतिनिधी**

मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणाईचे मानसिक आरोग्य बिघडत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. नागपुरातील कळमना परिसरातील एका १६ वर्षीय मुलाने मोबाईल वापरण्यास आईने मनाई केल्यामुळे चिडून घर सोडल्याची घटना घडली आहे. मुलाला छत्तीसगडच्या राजनांदगाव येथून शोधून आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

कळमना हद्दीत राहणाऱ्या ४३ वर्षीय महिलेला तिचा मुलगा अभ्यासाऐवजी दिवसभर मोबाईलवर वेळ घालवत असल्याचे दिसत होते. त्यामुळे तिने त्याला मोबाईल वापरण्यास मनाई केली.




यामुळे चिडून मुलाने १२ नोव्हेंबर रोजी घरातून पलायन केले. रात्र झाली तरी मुलगा घरी परतला नसल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. मात्र, मुलगा न सापडल्याने आईने कळमना पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीने फूस लावून मुलाला पळवून नेल्याची तक्रार दाखल केली.पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाने तांत्रिक तपास सुरू केला. तपासादरम्यान मुलगा छत्तीसगडच्या राजनांदगाव येथे असल्याचे समजले. तेथे त्याचे नातेवाईक राहत असल्याचे देखील उघड झाले.महिला पोलिस निरीक्षक ललिता तोडासे, सहायक फौजदार राजेंद्र अटकाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ राजनांदगाव गाठून मुलाला ताब्यात घेतले. त्यानंतर मुलाला सुरक्षितपणे नागपूरला आणून कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले.

**पालकांनी संवाद वाढवावा**

**मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये मानसिक ताण आणि घरातील वादविवाद वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.अशा घटनांमधून पालकांनी आपल्या मुलांसोबत संवाद वाढवून त्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.**


# त्या तरुणाने स्वखर्चातून सुरूकेला घरीच वाचनालय

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

मनुष्याने आपल्या कमाईचा काही भाग समाजासाठी अर्पण केला पाहिजे, असा प्रेरणादायी विचार घेऊन नागभीड तालुक्यातील गिरगाव येथील निरंजन रामराव बोरकर या तरुणाने स्वखर्चातून आपल्या घरीच वाचनालय सुरू केले आहे. योगाचार्य, कवी, दंडार व नाट्य कलावंत या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने, गावातील मुख्य रस्त्यालगत स्वतःच्या जागेत स्व. रामराव आत्मारामजी बोरकर स्मृती दैनिक वृत्तपत्र वाचनालय सुरू केले आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून मोबाईलच्या विळख्यात गुरफटलेल्या तरुणाईला वाचनाची ओढ लागावी, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, तसेच लहान मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा सकारात्मक उद्देश आहे.

वाचनालयात लहान मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, सामाजिक, वैचारिक, आध्यात्मिक विषयांवरील ग्रंथ, कवितासंग्रह, मासिके, साप्ताहिके आणि वृत्तपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या वाचनालयाचा फायदा वरिष्ठ नागरिकांनाही होतो, ज्यामुळे त्यांना वेळ वाचनात घालवता येतो.

निरंजन बोरकर यांनी आपल्या स्व. वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी हा उपक्रम सुरू केला असून, अल्पावधीतच वाचनालयाला गावकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील तरुणाईला प्रेरणादायी ठरत आहे.



# आरोग्य शिबिरात ३३५ रुग्णांची नि:शुल्क तपासणी व आयुर्वेदिक औषधोपचार

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वलनी मेंढा येथील सर्वज्ञ आयुर्वेदिक निसर्गोपचार केंद्रातर्फे नवरगाव येथील श्री दत्तात्रेय देवस्थान कमेटी (डोंगरी) येथे २२ डिसेंबर रोजी नि:शुल्क आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ ३३५ रुग्णांनी घेतला. श्री दत्त जयंती महोत्सवाच्या निमित्ताने देवस्थान कमेटीने दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील नि:शुल्क आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमाला सलग ८ वर्षे पूर्ण झाली आहेत.शिबिरात रुग्णांची वातविकार, लकवा, कफ, सर्दी, ताप, खोकला, मधुमेह, बी.पी.,



दमा,थायरॉईड अशा विविध आजारांची तपासणी करून आयुर्वेदिक औषधांचे वितरण करण्यात आले. डॉ.साहेबराव बारसागडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.गुलाब अमृतकर, डॉ.विद्याधर राऊत यांनी तपासणी व औषधोपचार केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तुलोपचंद गेडाम, अमित बंडावार, देवेंद्र शेंडे यांनी विशेष सहकार्य केले.समाजसेवेच्या कार्यासाठी डॉ.साहेबराव बारसागडे यांचा देवस्थान कमेटीच्या वतीने शाल व पुष्पमालांनी सत्कार करण्यात आला. या शिबिराने ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.

# शंभूकच्या विद्यार्थ्यांसाठी साकारणार नवे भोजन गृह दानशुरांसह माजी विद्यार्थ्यांचा मदतीचा हात

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

बहुजन शिक्षण संघ संचलित श्रीरामपूर येथील शंभूक विद्यार्थी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी लवकरच नवे भोजनगृह साकारले जाणार आहे. माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास बिहाणी यांच्यासह विविध दात्यांसह वसतिगृहाच्या माजी विद्यार्थ्यांनी यासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

माजी उपनगराध्यक्ष बिहाणी यांनी १लाख रू.,जसमितसिंग बतरा यांनी ५१ हजार रू., छल्लारे यांनी ११ हजार रू व संदिप ढोकचौळे यांनी११हजार रु.ची देणगी जाहीर केली.राजेश अलघ,प्रेमचंद कुंकूलोळ, दिनेश तरटे, वरूण अग्रवाल, बबनराव तागड,दिपक नागरे यांनी बांधकाम साहित्य देण्याचे जाहीर केले. आमदार हेमंत ओगले , बहुजन शिक्षण संघाचे कार्यकारी विश्वस्त ड. संघराज रुपवते,माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास बिहानी,राजेश अलघ,करण ससाणे, संजय छल्लारे यांच्याहस्ते भोजनगृहाचा भूमिपूजन सोहळा पार पडला. आले.याप्रसंगी बाजार समितीचे माजी सभापती सचिन गुजर,प्राईड केडमीचे ज्ञानेश्वर मुरकुटे, सद्भावना समितीचे ड. समिन बागवान, कामगार नेते जीवन सुरुडे, परिवर्तन फाउंडेशनचे मेजर कृष्णा सरदार, मराठा सेवा संघाचे नवनाथ अकोलकर, राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार प्राप्त बबनराव तागड, दत्तनगर ग्रामपंचायतीचे सूत्रधार प्रेमचंद कुंकुलोळ, मिशन वात्सल्य शासकीय समितीचे मिलिंदकुमार साळवे, सामाजिक कार्यकर्ते अर्जुनराव बचुटे, नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष कैलास खंदारे, बामसेफचे रमेश मकासरे, साहित्यिक डॉ. सलिम शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती. ड.संघराज रुपवते व मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन यशस्वी माजी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.यावेळी माजी विद्यार्थी व मान्यवरांनी भोजनगृह बांधकामासाठी मदत देण्याचे जाहीर केले. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ड.संघराज रुपवते यांनी बांधकामास लागणाऱ्या खर्चाच्या पन्नास टक्के रक्कम संस्थेच्यावतीने देण्याची घोषणा केली. वसतिगृहाचे अधीक्षक अशोक दिवे, सिद्धार्थ दिवे, कविता दिवे व त्यांच्या परिवाराने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे कौतुक करीत त्यांना रूपवते यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमास संजय दुशिंग, ड.अण्णासाहेब मोहन, राजेंद्र हिवाळे, प्रा.सुनिल वाघमारे,दिनेश तरटे, राजू धामोने, रवि पंडित, साजिद शेख, अतुल देसरडा,रामभाऊ सुगुर, फ्रांन्सिस शेळके, अमोल सोनवणे, ससकर सर, गोपाळे सर,चोभेसर अकबर शेख, संतोष त्रिभुवन, शुभम जाधव, प्रदिप शेळके,जालिंदर पठारे, संदिप डांगे,अशोक त्रिभुवन,दिपक गायकवाड, सिध्दार्थ गायकवाड, बाबासाहेब पंडित,मनोज उदमले,शंकर पवार , संदिप ढोकचौळे,सोमनाथ डांगे,दिपक नागरे,यांच्यासह पुणे, नगर, नाशिक आदी ठिकाणाहून आलेले आजी माजी विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. वसतिगृहाचे अधीक्षक अशोक दिवे यांनी सूत्रसंचालन केले. सिध्दार्थ दिवे यांनी आभार मानले.



### युवा कुस्तीपटूंकडे मोठ्या आशेने पाहत असून

# त्यांनी अधिक जोमाने सराव करून महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवावा-आ.संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



पुरुष ग्रीकोरोमन व महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा निवड चाचणी स्पर्धा, सावेडी येथील संभाजी राजे कुस्ती केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडली. यातून विजेत्या ७ महिला व १० पुरुषांचा संघ जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेला जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष संग्राम जगताप हे उपस्थित होते त्यांनी सहभागी कुस्तीपटूंना प्रोत्साहन दिले. तसेच निवड झालेल्या संघाचे अभिनंदन करत त्यांना पुढील स्पर्धेमध्ये उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. वर्धा येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत हे कुस्तीपटू अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेकडे देशातील सर्व कुस्तीपटूंचे लक्ष असते. आता आपल्या जिल्ह्यातील खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये मोठे यश प्राप्त करावे. कुस्तीगीर संघाच्या वतीने मुला-मुलींना कुस्ती खेळण्यासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जात आहे. स्पर्धेतून खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असून त्यातून आपली तयारी कळत असते. जिल्हा कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्राला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्व प्रयत्न करणार आहे. आम्ही युवा कुस्तीपटूंकडे मोठ्या आशेने पाहत असून त्यांनी अधिक जोमाने सराव करून महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवावा व आम्हा सर्व नगरकरांचे स्वप्न पूर्ण करावे.असे ते यावेळी बोलले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा.डॉ.संतोष भुजबळ, माजी नगरसेवक सागर बोरुडे, स्पर्धेचे आयोजक शिवाजी चव्हाण, जिल्हा कार्यकारणी सदस्य निलेश मदने, माधव सावंत, हनुमंत फंड, संदीप गायकवाड,पोपट शिंदे, कानिफनाथ मुखेकर, अजय आजबे, एकनाथ उचाळे, साहेबराव पवार, मच्छिंद्र उचाळे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी पंच आणि तांत्रिक अधिकारी म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच प्रा. संभाजी निकाळजे, पंच विवेक नायकल, ईश्वर तोरडमल तर संयोजक म्हणून निलेश मदने यांनी काम पाहिले.

# कोपरगाव मतदारसंघातील मतदारांप्रति कृतज्ञता सोहळा



**कोपरगाव । प्रतिनिधी**


कोपरगाव मतदारसंघातून विक्रमी मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल कोपरगाव मतदारसंघातील मतदारांप्रती कृतज्ञता सोहळा व मतदारांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांचा नागरी सत्कार सोहळा आज कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर माजी आमदार अशोकदादा काळे यांच्या अध्यक्षतेखाली व विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी आशुतोष काळे हे पुन्हा आमदार व्हावे यासाठी चप्पल न घालण्याचा नवस करणाऱ्या भोजडे येथील सलीमभाई शेख यांचे चैतालीसह पाय धुवून त्यांचा सन्मान केला.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद - पंचायत समिती सदस्य, माजी नगरसेवक, कारखाना व संलग्न संस्थांचे अधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# राहुरीत पादुका दर्शन सोहळ्यास भाविकांची मांदियाळी

**राहुरी । प्रतिनिधी**



दक्षिण पीठ नाणीजधामचे मठाधिपती जगतगुरु स्वामी नरेंद्राचार्य यांचे पादुका दर्शन व प्रवचन सोहळा राहुरी शहरात मोठ्या उत्साहात गुरुवारी संपन्न झाला. जिल्ह्यातील हजारो भाविकांनी उपस्थिती दर्शवुन सोहळ्याचा आनंद लुटला.

प्रारंभी राहुरी शहरातील शनी मंदिर येथून जगतगुरु स्वामी नरेंद्राचार्य यांच्या सिद्ध पादुकांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. माता भगिनी, अबालवृद्ध या मिरवणुकीत सहभागी झाले होते. नगर-मनमाड रोडलगत भव्य पटांगणात मिरवणूक पोहचल्यानंतर आरती, पादुका पूजन, प्रवचन, उपासक आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

यावेळी सामाजिक जाणिवेच्या भूमिकेतून अहिल्यानगर जिल्ह्यातील स्व स्वरूप संप्रदायाच्यावतीने उत्तर महाराष्ट्र पीठ नाशिक ते श्री क्षेत्र नाणीज पायी दिंडी सोहळ्यासाठी टॉयलेट वाहनाचे वितरण करण्यात आले. यावेळी स्व स्वरूप संप्रदायाचेचे उत्तर महाराष्ट्र, अहिल्यानगर दक्षिण व उत्तर जिल्ह्याचे पदाधिकारी व हजारो भाविक उपस्थित होते.

# सोमनाथच्या आईचा राहुल गांधींसमोर टाहो; मारेकऱ्यांना फाशीची मागणी

**परभणी । प्रतिनिधी**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी सोमवारी (दि. २३) परभणीतील अण्णा भाऊ साठे नगरात जाऊन मृत सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी सोमनाथच्या आईने मुलाच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत टाहो फोडला.

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेनंतर उसळलेल्या आंदोलनामध्ये अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यात सोमनाथ सूर्यवंशीचा समावेश होता. न्यायालयीन कोठडीत असताना सोमनाथचा मृत्यू झाला, ज्यामुळे संपूर्ण शहर हादरले.

सोमनाथच्या कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी राहुल गांधी दुपारी २.३० वाजता परभणीत दाखल झाले. त्यांनी सोमनाथच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यांनी कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राहुल गांधी यांच्यासमवेत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, बाळासाहेब थोरात, खा. प्रणिती शिंदे, यशोमती ठाकूर,



विजय वडेट्टीवार, आ. प्रज्ञा सातव, खा. संजय जाधव, आ. नितीन राऊत, आ. अमित देशमुख, आणि आ. डॉ. राहुल पाटील उपस्थित होते.

सोमनाथच्या आईच्या न्यायासाठी आक्रोश आणि आंदोलनामुळे या घटनेची सखोल चौकशी व मारेकऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# विद्यार्थ्यांनो विज्ञानाच्या प्रयोगशीलतेतून नव्या संधींचा शोध घ्या-आ.किशोर जोरगेवार

### जिल्हा परिषदेच्या वतीने ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




विज्ञान ही केवळ एक विषयवस्तू नसून ती विचार करण्याची एक पद्धत आहे. विज्ञान आपल्याला प्रश्न विचारायला शिकवते आणि उत्तरे शोधायला प्रेरित करते. आजच्या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रकल्प, संशोधन आणि प्रयोग पाहून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशा वाटते. आपल्या कल्पकतेतून समाजातील समस्यांचे समाधान शोधण्याचा प्रयत्न करत नव्या संधींचा शोध घ्या असे आव्हाहन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.जिल्हा परिषद शिक्षण विभाग, पंचायत समिती चंद्रपूर यांच्या वतीने ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन२०२४-२०२५ चे आयोजन न्यू इंडिया कॉन्व्हेंट येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले, युवा जागृत क्रीडा मंडळ व ज्ञान प्रसारक मंडळ चंद्रपूरचे आशिष धिर, पंचायत समिती चंद्रपूरचे गटशिक्षाधिकारी निवास कांबळे, गटविकास अधिकारी संगीता भांगडे, संजय सिंग आणि न्यू इंडिया कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका वैशाली जनेकर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.आमदार किशोर जोरगेवार पुढे म्हणाले की, तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा योग्य वापर हा आजच्या काळाची गरज आहे. देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.सरकार देखील विज्ञान शिक्षणासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देत आहे.शाळांमध्ये प्रयोगशाळा, विज्ञान केंद्रे आणि संशोधन उपक्रमांना चालना दिली जात आहे.

यासोबतच आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि कठोर मेहनत महत्त्वाची आहे. अपयश आले तरी त्याकडून शिकण्याची तयारी ठेवा. मोठे वैज्ञानिक आणि संशोधक अपयशांमधूनच मोठे शोध लावू शकले आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रयोग हा यशाच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.विद्यार्थ्यांनी यापासून प्रेरणा घ्यावी,असे आवाहन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आमदार किशोर जोरगेवार यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान प्रयोगांची पाहणी केली. या कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गुरुकुले यांच्या घरी जाऊन भेट घेत आ.अमोल खताळ यांनी सांत्वन केले



**संगमनेर । प्रतिनिधी**

सावरगाव तळ येथील कै.रामनाथ सूर्यभान गुरुकुले यांचा चंदनापुरी शिवारातील जंगलात हिंस्र प्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला. गुरुकुले कुटुंबीयांवर या घटनेमुळे दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांची घरी जाऊन भेट घेत आमदार अमोल खताळ यांनी सांत्वन केले. त्यांच्या दुःखात माझ्यासह संपूर्ण तालुक्यातील जनता सहभागी आसल्याचे ते बोलले . तसेच गुरुकुले यांच्या कुटुंबियांना सरकारकडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले असून वन अधिकाऱ्यांना तसे निर्देश दिले आहेत.

बिबट्या सारख्या हिंस्र प्राण्यांचे हल्ले तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चालले असून अनेक जणांचा यात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान बिबट्यांच्या वाढत चाललेल्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची विनंती उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेबांना केली आहे.

# ना.राधाकृष्ण विखे जलसंपदा मंत्री यांचा लोणी येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून सत्कार

**राहुरी | प्रतिनिधी**

राज्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने महायुतीला पाठबळ दिले, जो विश्वास दाखवला तो विश्वास कामातून सिध्द करुन दाखविण्याचा भविष्यात निश्चित प्रयत्न होईल. अहिल्यानगर जिल्ह्याने नेहमीच पाण्यासाठी संघर्ष केला. त्यामुळे जलसंपदा विभागाकडून शेतक-यांसह सामान्य माणसाच्याही असलेल्या अपेक्षा पुर्ण करण्याचा यापुढे प्रयत्न असणार आहे. दुष्काळमुक्त जिल्हा करणे हेच आपले उदिष्ट असेल अशी ग्वाही जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी दिली.

जलसंपदा खात्याच्या मंत्री पदाचा कार्यभार आल्यानंतर ना.विखे यांचे प्रथमच मतदार संघात आगमन झाले. जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉग्रेस आणि मित्रपक्षांच्या वतीने त्यांचा सोमवारी लोणी येथे सत्कार करण्यात आला. जनसेवा संपर्क कार्यालयात ना.विखे यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. नामदार विखे



पाटील यांनी कार्यकर्त्यांमध्ये उभे राहून सत्कार स्वीकारले.व प्रत्येका बरोबर फोटो काढले त्यांनी प्रत्येकाचे सत्कार, शुभेच्छा, अभिनंदन स्वीकारले त्याचबरोबर मतदार संघातील व जिल्ह्यातील आलेल्या कार्यकर्ते पदाधिकारी यांच्याशी मनमोकळे व दिलखुलासपणे चर्चाही केली .

राहता तालुक्यातील लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात ना.विखे यांचे अभिनंदन करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातून महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक आणि प्रशासनातील आधिकारी उपस्थित होते.

यावेळी जेष्ठ नेते माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार.किरण लहामटे,

जलसंपदा विभागाचे नाशिक विभागाचे अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सौ.सोनल शहाणे, मुळा लाभक्षेत्राच्या कार्यकारी आधिकारी सौ.सायली पाटील, निळवंडे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हारदे यांच्यासह संभाजीनगर येथील गोदावरी लाभक्षेत्राशी निगडीत सर्व शाखांचे आधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. तसेच शिर्डी मतदारसंघातील गावातील पदाधिकारी कार्यकर्ते येथे शेतकरी . जिल्ह्यातील अधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते

यावेळी महायुती सरकारने दिलेली सर्व आश्वासनं पुर्ण करण्याची हमी ही नव्याने स्थापन झालेल्या मंत्रीमंडळाकडून निश्चित होईल अशी ग्वाही देवून मंत्री विखे म्हणाले की, महायुती सरकारला सर्वात मोठा असा जनाधार मिळाला आहे. याचे एकमेव कारण, युती सरकारने ज्या योजना जाहिर केल्या. त्याची अंमलबजावणी यशस्वीपणे झाली. महायुती सरकारने आपल्या कामातून लोकांना नवा विश्वास दिला होता. त्याच विश्वासाचे फलीत हे निकालाच्या माध्यमातून दिसून आले. भविष्यातही हाच विश्वास कामाच्या आणि योजनांच्या माध्यमातून कृतीत उतरविण्याचा प्रयत्न महायुती सरकार निश्चित करेल अशी ग्वाही नामदार राधाकृष्ण विखे यांनी यावेळी दिली.जलसंपदा विभागातून काम करण्याची मोठी संधी आपल्याला मिळाली आहे. गोदावरी आणि कृष्णा हे सर्वात मोठे असे खोरे आहे. प्रत्येक माणसासाठी पाणी हा महत्वाचा विषय आहे. लाभक्षेत्रातील शेतक-यांसह जनतेच्याही असलेल्या अपेक्षा या भविष्यात आपल्याला पुर्ण करायच्या आहेत. कारण आपल्या भागाने पाण्यासाठी सदैव संघर्ष केला. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून आता दुष्काळमुक्त जिल्हा करणे हेच आपले उदिष्ट असल्याचे त्यांनी शेवटी आवर्जुन सांगितले.

## घरकुलाच्या ६ हजार ३०५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध-सिद्धाराम सालीमठ

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

घरकुलाच्या ६ हजार ३०५ लाभार्थ्यांना प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिली आहे, उर्वरित ३९८ लाभार्थ्यांनाही लवकरच जागा उपलब्ध करून दिली जाईल, असे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठकीत समितीचे अध्यक्ष खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि सहाअध्यक्ष निलेश लंके यांनी केंद्र पुरस्कृत योजनांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राहुल शेळके उपस्थित होते.

यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी



योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना कांदा चाळ उभारणी, कृषी यांत्रिकीकरण, अमृत सरोवर, ई महाभूमी, ई नकाशा, ई फेरफार, स्वामित्व योजना, सामाजिक विकासाच्या विविध योजना, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना, पीएम कुसुम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आदी योजनांचा आढावा घेतला.

## वर्धा जिल्हाधिकारीपदी वानमती सी.यांची नियुक्ती

**वर्धा | प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्याच्या नवीन जिल्हाधिकारीपदी राज्य शासनाने श्रीमती वानमती सी. यांची नियुक्ती केली आहे. त्या यापूर्वी राज्य कर विभागात सह आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. प्रशासनातील त्यांच्या अनुभवाचा वर्धा जिल्ह्याच्या विकासासाठी मोठा उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची बदली नाशिक महानगरपालिका आयुक्तपदी करण्यात आली आहे. वर्ध्यातील विविध विकास योजनांची अंमलबजावणी, शासकीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी वानमती सी. यांचे प्रशासन कौशल्य महत्त्वपूर्ण ठरेल. राज्य कर विभागात त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कर व्यवस्थापन आणि महसूल वाढवण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली वर्धा जिल्ह्यातील प्रलंबित प्रकल्पांना गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.



## वरकुटे बुद्रुक येथे शिक्षकाच्या गाडीची तोडफोड

**इंदापूर | दत्तात्रय गवळी**

इंदापूर तालुक्यातील वरकुटे बुद्रुक येथे मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे यांच्या घराजवळ उभी असलेल्या त्यांच्या नवीन व्हॅगनार गाडी (MH 42 BE 7936) ची तोडफोड करण्यात आली. ही घटना सोमवारी, २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ८ ते ९ वाजताच्या दरम्यान घडली.

सदर गाडीची पाठीमागील काच फोडण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून संबंधित शिक्षक व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची तक्रार इंदापूर पोलीस स्टेशन येथे नोंदवण्यात आली आहे. पोलीस हवालदार केमदार साहेब व त्यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली असून दोषींना लवकरच शोधून काढण्याचे




आश्वासन दिले आहे. तोडफोडीच्या कारणांचा अद्याप खुलासा झालेला नसून पोलिसांचा तपास सुरू आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

## श्री साई कॉन्व्हेंट सी.बी.एस.ई.मध्ये फुड फेस्टीवल

# फुड फेस्टीवलचा विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी घेतला आनंद

**भद्रावती | प्रतिनिधी**

श्री साई कॉन्व्हेंट सी.बी.एस.ई कुनाडाच्यावतीने स्थानिक श्री साई लॉनमध्ये नुकताच सांस्कृतीक उपक्रमाचा भाग म्हणून आयोजित फुड फेस्टीवलचा आनंद विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अतुल बडकेलवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून गट साधन केंद्रातील विशेष तज्ज्ञ छाया खनके, संस्था अध्यक्षा कांताताई गुंडावार, प्रा.अतुल गुंडावार , मुख्याध्यापिका किरण कोथळे रूपाली नंदनवार आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. फुड फेस्टीवलचे उद्घाटन प्रा.अतुल गुंडावार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या वेळी वर्ग दुसरी ते दहावीच्या मुला मुलींनी लावलेल्या फुड स्टॉलची मान्यवरांनी पाहणी केली. स्टॉलवर पाव भाजी, गुपचूप, सांबार वडा, ढोकळा,उत्तंपम ,पेस्टी, कच्चा चिवडा, नुडल्स, मंच्युरियन ,ओरीवो सेफ, कॉफी , चहा आदी वस्तुंचे स्टॉल लावण्यात आले होते.कार्यक्रमाचे सुत्र संचालन व्यंकटेश




केंद्रे,आभार प्रदर्शन अफान शेख यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रतिक्षा येनगुर्थवार , प्रिया जोशी,निशा कन्नोजवार , भावना वाळके प्रिया रायपुरे,आम्रपाली वाघमारे,श्वेता बन, सारीका शेंडे, सरस्वती लांडगे,मोनीका कारेकर, गणेश यंम्पलवार, विजय पथाडे, क्लिंटन सिंग, शिवानी पतरंगे आदी शिक्षकवृंदानी सहकार्य केले.

## पोलिसांनी केले आव्हान

# भंडारा जिल्ह्यातील शेअर मार्केट फसवणुकीच्या प्रकरणात गुंतवणूकदारांनी नोंदवावे बयाण

**भंडारा | प्रतिनिधी**

लाखनी - तालुक्यातील शेअर मार्केट ऑनलाईन ऑप्शन ट्रेडिंगचे नावाखाली आरोपी मोहीत मोहन पाखमोडे, रा. सेलोटी ता. लाखनी जि. भंडारा यांनी भंडारा शहरातील व तालुक्यातील बरेच लोकानां त्यांनी गुंतविलेल्या रक्कमेवर प्रती महिना ५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक व्याज देण्याचे आमिष देवून फार मोठया प्रमाणावर नगदी, युपीआय व बैंक खात्याच्या माध्यमातून स्वतःचे बैंक खात्यावर पैसे जमा केले. सुरुवातीला त्याने नेमून दिलेल्या व्याजदाराप्रमाणे पैसे दिले. त्यांनतर व्याज किंवा त्यांची मुद्यल परत न करता एकूण २६,०७,९००/- रुपयाची फसवणुक केली असल्याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन भंडारा जिल्हा-भंडारा येथे अपराध क्रर्मांक ७८८/ २०२४ कलम ४०६, ४२० भादवि. सहकलम २१,२२ बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंध अधिनियम, २०१९ सहकलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, २०१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर




गुन्हयाचा तपास विजय कसोधन, पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा हे करीत आहेत. सदर आरोपी यास गुन्हयात अटक करण्यात आली असून पोलीस कस्टडी दरम्यान गुन्हयासंबधात सखोल तपास करण्यात आला आहे. सध्या आरोपी भंडारा जिल्हा करागृह येथे बंदीस्त आहे. तरी ज्या लोकांनी सदर आरोपीस नगदी, युपीआय व बैंक खात्याच्या माध्यमातून शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवणूक करण्यास दिले असेल व ज्यांची फसवणूक झाली असेल अशा लोकांनी त्यांनी गुंतविलेल्या पैशाचे पुराव्यासह मा. पोलीस अधिक्षक कार्यालय, आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा येथे हजर होवून आपले बयाण नोंदवावे.

# परभणी येथील प्रकरणाच्या विरोधात भंडारा येथे निदर्शने

**भंडारा | प्रतिनिधी**

परभणी येथील भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेबांच्या पुतळा परिसरातील संविधान शिल्पाची विटम्बना व अपमान करणाऱ्या समजकंटकान्ना तसेच आम्बेडकरी कार्यकर्त्यांच्या मृत्युस कारणीभूत पोलिस अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कृतिचा निषेध व कारवाई म्हणून असित बागडे,अजय मेश्राम , विनय बनसोड,विनीत देशपांडे याच्या नेतृत्वाखाली दि.२१ १डिसेम्बर २४ ला परभणी हत्याकांड व दंगल विरोधी कृती समिती भंडारा तर्फे भंडारा बंद व निषेध मोर्चा चे आयोजन करण्यात आले

यात सकाळी ५०० आंबडेकरिन युवकांनी बाईक रॅली काढली शहरातील लहान मोठे प्रतिष्ठाण स्वतःहून बंदमध्ये सहभागी होऊन बंद ला शहरातील नागरिकांनी मोठा सहकार्य केला,बाईक रॅली शास्त्री चौक येतून गांधी चौक पोस्ट ऑफिस चौक मुस्लिम लायब्ररी चौक, राजीव गांधी चौक, जिल्हापरिषद चौक , गणेशपुर ,खात रोड परिसरात मधून निघाली दुपारी २ वाजता आक्रोश मोर्चा काढला यात मोठ्या संख्येने महिला,मूल मुली यांनी सहभागी घेतला आरोपीवर कठोर करवाई ची मागणी करण्यात येत आहे.निषेध मोर्चा ला त्रिमूर्ती चौक येथे मार्गदर्शन करण्यात आले यात अमृत बनसोड,सदानंद इलमे,असित बागडे, चंद्रशेखर टेंभुर्णी, अजय मेश्राम,सुहास गजभिये, परमानंद मेश्राम यांनी



मोरच्याला मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचलन विनीत देशपांडे यांनी केले होते. भंडारा बंद व निषेध मोरच्याला भंडारा शहरातील नागरिकांनी व व्यापारी वर्गाने मोठा प्रतिसाद दिला सोबतच आंबडेकर जनतेनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिले परभणी घटनेचा व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वर कार्यवाही करण्यात यावे अशी मागणी निवेदन देण्यात आले . सविस्तर घटना अशी आहे की, परभणीच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बाबासाहेबांच्या पूतल्या समोरिल काचेच्या पेटितील संविधानाच्या प्रतिकृती ची सायं ४-५ च्या दरम्यान एका समाज कंटकाने विटम्बना केली. ही अपमानजनक घटना लोकांच्या लक्षात आल्यावर त्या कंटकाला चोप दिला व पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेच्या निषेधार्थ कार्यकर्त्यांनी परभणी जिल्हा बंद ची हाक दिली, दुपारपर्यन्त बंद शांततेत पार पडला परंतु दुपार नन्तर काही असामाजिक तत्वांनी बंद ला गालबोट लावत दुकानांची तोड़फोड़ करीत हिंसाचार केला. पोलिसांनी त्यांना सोडून आम्बेडकरी कार्यकर्त्यांची धरपकड़ करुन अटक करत त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले, एवढेच नव्हे तर पोलिसांनी सायंकाळी बौद्ध वस्तीत जावून निष्पाप लोकांना व महिलांना घरातून ओढुन मारहाण करुन कोम्बिंग ऑपरेशन केले. बंद दरम्यान हिंसाचार व तोड़फोड़ करणाऱ्या पोलिसांचे व समाज कंटकाचे चित्रीकरण करणाऱ्या निरपराध, कायदयाचे शिक्षण घेणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांना बळजबरिने अटक करुन पोलीस कोठडित बेदम मारहाण करुन त्याचा खून केला, शांततेत आंदोलन करणाऱ्या विजय वाकोडे यांच्यावर एफ आय आर नोंदवला. पोलिसांकरवी होत असलेल्या मारहाण व मृत्यु चा धसका घेतल्यामुळे यांचा हृदयविकाराने मृत्यु झाला, या दोन्ही भीमसैनिकांच्या मृत्युस परभणी पोलिस च जबाबदार आहेत.१० डिसेम्बर ला सकल हिन्दू परिवारातर्फे बांग्ला देशातील अल्पसंख्यक हिंदू वर होत असलेल्या अत्याचाराविरोधात काढण्यात आलेल्या मोर्च्यात तोड़फोडिचा आरोपी हा सहभागी होता, यावरून असे निदर्शनास येते की या मागचा सूत्रधार कोणी वेगळाच् व्यक्ति आहे, या सूत्रधाराचा शोध घेवून त्यांच्यावर सुद्धा कड़क करवाई करण्यात यावी. तसेच परभणीतील प्रकारणाची न्यायालयिन चौकशी करण्यात यावी.अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आले निवेदन नायब तहसीलदार सोनकुसरे ,मंडळ अधिकारी गेडाम यांनी स्वीकारले,हे निवेदन, जिल्हाधिकारी यांच्या मार्फत प्रधानमंत्री कार्यालय येथे पाठविण्यात आले निवेदन देते वेळीस असीत बागडे विनय बनसोड अजय मेश्राम विनोद देशमुख , मयूर नंदेश्वर, सम्येक खोब्रागडे, शुभम रामटेके, सुरज डोंगरे, चांद डोंगरे, रितिक वासनिक, मुकुल रंगारी, मृणाल रंगारी, अभि भगत,चेतन घोडीचोर, विक्की फुले, राहुल रामटेके, नीलिमा रामटेके.. सचिन बागडे, करण रामटेके, खोब्रागडे , रत्नमाला वैद्य , तथागत फुले, सुरज भालादरे ,नाशिक चौरे अजित बनसोड, सुगत शेंडे, डॉक्टर यशवंत मदामे, सुदेश वैद्य ,सुधाकर चव्हाण ,इंदिरा तिरपुडे,सनम गेडाम ,सुरेश मुटकरे संजय मते संजय रामटेके ,राकेश शामकूवर ,सदानंद इलमे, राजपाल नाईक ,राधेश्याम तिरपुडे सम्यक गजभिये अमृत बनसोड किशोर मेश्राम, राजेश मेश्राम मयूर नंदेश्वर, परमनंट मेश्राम, चंद्रशेखर टेंभुर्णी,डॉ बाळकृष्ण सारवे, रोशन जांभूळकर, घायनचंद जांभूळकर ,ताराचंद उईके , दिलीव वानखेडे,संजीव भांभोरे, विजय भोवते,शिवदास गजभिये, हे तसेच मोठ्या संख्येने आंबेडकरी अन्याय उपस्थित होते

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील-मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर - सिंह, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. पंपांना वीज पुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत काम सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर चालविण्यात येतील.

या कार्यक्रमाला उंबर्डा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यातील



उंबर्डा येतील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट आहे. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार आहे. धाराशीव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील प्रकल्प २ मेगावॅट क्षमतेचा आहे. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. वाशिम आणि धाराशीव जिल्ह्यातील एक - एक सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प यापूर्वीच सुरू झाले आहेत.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतील पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण मा.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत राज्यात नोव्हेंबर अखेर १५,७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १,३०,४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे.राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री अशा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा केला जातो.

शेतकऱ्यांना केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी अनेक दशकांची मागणी आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेत राज्यभरात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून विकेंद्रीत स्वरुपात कृषी फीडर्सना विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल तसेच या योजनेत किफायतशीर दरात वीज मिळाल्यामुळे राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल

# भंडाऱ्यात बसपाचा भव्य धरना प्रदर्शन शाह यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपमाना समोर एकजुटीने उभा राहिला बहुजन समाज




**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बहुजन समाज पार्टी (बसपा) तर्फे एक दिवसीय धरना प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या आंदोलनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केल्या गेलेल्या अपमानजनक विधानाचा तीव्र निषेध करण्यात आला. याशिवाय, परभणी येथे घडलेल्या घटनेचा देखील निषेध करण्यात आला, ज्यात मृत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.आंदोलनाच्या प्रारंभात बसपाचे जिलापदाधिकारी आणि विविध पदाधिकारी यांनी उपस्थित जनतेला संबोधित केले. त्यांनी अमित शाह यांच्या विधानाबद्दल आक्रोश व्यक्त करत, यामागील विचारधारेवर चर्चा केली. डॉ. आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अपमान सहन केला जाणार नाही, असे वक्तव्य करण्यात आले.आंदोलनाचा मुख्य उद्देश होता अमित शाह यांच्याकडून माफी मागणे, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे अपमानजनक विधान होणार नाहीत. या संधीसाठी बसपाचे कार्यकर्ते एकत्र आले आणि एकजुटीने आवाज उठविला. त्यांनी आंबेडकरवादी विचारधारा जिवंत ठेवू या घोषणांसह आंदोलनात भाग घेतला.परभणी घटनेच्या संदर्भात, बसपाने मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाईची मागणी केली. या घटनेमध्ये राज्यघटनेच्या प्रतिकृतीचे तोडफोड करणाऱ्यांवर योग्य कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या घटनेमुळे बहुजन समाजावर होणारा अन्याय वाढला आहे. आम्ही या अन्यायाच्या विरोधात एकत्र येऊन आवाज उठवित आहोत, असे बसपाचे नेते म्हणाले.आंदोलनात विविध विधानसभा स्तरावरील पदाधिकारी, बूथ आणि सेक्टर स्तरावरील कार्यकर्ते, तसेच बसपाचे असंख्य समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. उपस्थितांनी एकमेकांना सहकार्य करून आंदोलनाची यशस्विता सुनिश्चित केली. आंदोलनानंतर, महामहिम राष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना जिलाधिकारी मार्फत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात अमित शाह यांच्या विधानाबद्दल माफीची मागणी आणि परभणी घटनेतील दोषींवर कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# मुलीवर बिबट्याचा हल्ला ;मुलगी बचावली

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील चितळी परिसरात श्रीरामपूर रस्त्यावर साळुंखे पेट्रोल पंपालगत घडली. साक्षी विकास वाघ असे हल्ल्यातील जखमी मुलीचे नाव असून .साळुंखे पेट्रोल पंपाशेजारील रस्त्यावरून साक्षी वाघ ही आपल्या घरी चालली असताना मकाच्या शेतातून अचानक रस्त्यावर आलेल्या बिबट्याने तिच्यावर अचानक हल्ला केला. बिबट्याने तिच्या पायावर पंजा मारल्याने ती गंभीर जखमी झाली आहे. उपचार करण्यासाठी साक्षी हिला अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे.साक्षीवर हल्ला केल्यानंतर थोड्याच वेळेत या रस्त्यावरून चितळीकडे जाणारे बाळासाहेब वाघ यांच्या मोटारसायकलवर झेप घेवून, बिबट्याने जीवघेणा हल्ला केला, मात्र त्यांनी स्वतःला सावरत मोटारसायकल वेगाने पुढे नेली असता, बिबट्याने त्यांचा पाठलाग केला. बिबट्याने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने त्यांचा मोटारसायकलवरील ताबा सुटला. खाली पडून त्यांचा अपघात झाला. वाघ यांच्या डोक्याला जबर जखम झाली आहे. उपचारासाठी त्यांना तत्काळ श्रीरामपूर येथील कामगार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

चितळी पुणतांबा परिसरात अजुनही बिबट्याची भीती आहे. साळुंखे पेट्रोल



पंपाजवळ मक्याच्या शेतामध्ये बिबट्या लपला आहे. मादी बिबट्यासह येथे दोन बछड्यांचा मुक्त संचार सुरु असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले . हल्ल्याच्या घटनांमुळे चितळी स्टेशन परिसरामध्ये खळबळ उडाली आहे. वन विभागाच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तरी आता ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. बिबट्यांचा लवकर बंदोबस्त करावा, अशा मागणीचे अनेकदा वन विभागाला निवेदन देऊनसुद्धा बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला अपयश आले आहे.बिबट्याने हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव येथील वन परीक्षेत्र अधिकार्यांच्या दालनासमोर उपोषण करण्याचा इशारा संतप्त झालेले चितळीचे लोकनियुक्त सरपंच नारायण कदम, अतुल चौधरी, दीपक वाघ, सोपान वाघ, सोनाजी पगारे, दत्ता साळुंखे, कैलास वाघ, शुभम कांबळे, ओंकार वाघ, शैलेश वाघ, प्रदीप चौधरी, विकास वाघ आदींसह ग्रामस्थांनी दिला आहे.

# स्विकृत नगरसेवकपदी ॲड.मंगेश औटी

## सर्वांगीण विकासासाठी योगदान देणार : मंगेश औटी

**पारनेर । प्रतिनिधी**

पारनेर नगरपंचायतीच्या स्विकृत नगसेवकपदी ड. मंगेश सुभाषराव औटी यांची मंगळवारी निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते योगेश मते यांनी ड. मंगेश औटी यांच्या नावाची सुचना मांडली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण योगदान देणार असल्याचे ड. औटी यांनी निवडीनंतर सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे स्विकृत नगसेवक डॉ. सादिक राजे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर नव्या नगरसेवकाची नियुक्ती करण्यासाठी नगरपंचायत नगरसेवकांच्या विशेष बैठकीचे पिठासीन अधिकारी तथा पारनेर-श्रीगोंद्याचे प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या उपस्थितीत बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीत गटनेते योगेश मते यांनी ड. मंगेश औटी यांच्या नावाची सुचना



मांडल्यानंतर ड.औटी यांनी स्विकृत नगरसेवक पदासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे पिठासीन अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्याकडे सुपूर्द केली. कागदपत्रांची छाननी केल्यानंतर चिंचकर यांनी ड. औटी यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली. निवडीनंतर चिंचकर यांच्या हस्ते औटी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याधिकारी विनय शिपाई, दिपक लंके, नगराध्यक्ष नितीन अडसुळ, अर्जुन भालेकर, योगेश मते, राजू शेख, डॉ. विद्या कावरे, निता औटी, हिमानी नगरे, प्रियंका औटी, सुप्रिया शिंदे, भुषण शेलार, अशोक चेडे, डॉ. बाळासाहेब कावरे, भाऊ ठुबे, विजय भा. औटी, वैभव गायकवाड, अमित जाधव, कांतीलाल ठाणगे, अर्जुन बढे, दिपक नाईक, गणेश ठुबे, दिपक नाईक, मयुर औटी, धनंजय औटी, राजू पाचारणे, घनश्याम कार्ले आदी उपस्थित होते.

### सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न

**खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली स्विकृत नगरसेवक पदाच्या माध्यमातून आपण पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहोत. सन १९९२ मध्ये वडील ड. सुभाषराव औटी यांनी पारनेर ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. त्यानंतर आता आम्हाला दुसऱ्यांदा शहर विकासासाठी योगदान देण्याची संधी प्राप्त झाली असून खा. नीलेश लंके यांनी दिलेल्या संधीचे सोने करू.**

**-ॲड.मंगेश औटी ,स्विकृत नगरसेवक**

# मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी महत्वाचे प्रकल्प कार्यान्वित करावेत-आमदार हेमंत पाटील







**नांदेड । बालाजी पाटील**

नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देण्यात यावी, कृष्णा खोऱ्यातील वाहून जाणारे पाणी लातूर, धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्यात यावे, उजनी धरणाचे २५ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळवून यासह मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी महत्वाचे प्रकल्प मार्गी लावून कार्यान्वित करावेत.अशी अभ्यासपूर्ण मागणी विधान परिषद शिवसेना गटनेते तथा आमदार हेमंत पाटील यांनी विधान परिषदेत केली.

सिंचनाच्या बाबतीत मराठवाडा आजपर्यंत मागे असल्यामुळे मराठवाड्याचा विकास सुद्धा म्हणावा त्या गतीने झालेला नाही.सिंचन आणि पाण्याची मुबलक सुविधा झाल्यास मराठवाडा सुजलाम सुफलाम होऊ शकतो. महायुती सरकारने मागील कार्यकाळात अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेऊन पूर्णत्वास नेले आहेत.मुंबईमधील वाहतुकीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कोस्टल रोड शिवडी - न्हावाशेवा रस्त्यामुळे मुंबईमधून जलद गतीने बाहेर पडण्यासाठी मदत झाली आहे.त्यामुळे आता महायुती सरकारला विनंती आहे की, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प मार्गी लावावेत अशी मागणी आमदार हेमंत पाटील यांनी केली.विधान परिषदे मध्ये अभ्यासपूर्ण मांडणी करताना आमदार पाटील म्हणाले की, १६ सप्टेंबर २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत ३७ हजार १६ कोटीच्या मराठवाडा विकासाच्या योजनांना मंजुरी देण्यात आली होती.त्या अनुषंगाने यंत्रणा कार्यन्वित करावी. तसेच सिंचन अनुशेष भरण्यासाठी २०१६ साली मंजूर झालेला व २०१७ साली निविदा निघालेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प सुद्धा हाती घ्यावा.

मराठवाडा विभागातील ६४ लाख ४५ हजार हेक्टर क्षेत्र लागवडियोग्य आहे परंतु त्यापैकी केवळ ११.८६ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणले आहे.आणखी ६.७१ लक्ष हेक्टर सिंचन अनुशेष शिल्लक आहे.यासाठी वैनगंगा, नळगंगा,पैनगंगा या मराठवाडा विदर्भाला जोडणाऱ्या प्रकल्पास मान्यता द्यावी.पहिल्या टप्यात ३२६ किमी च्या कालवे दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याच धर्तीवर नळगंगा ते पैनगंगा कालवे जोडणीस सुद्धा प्रशासकीय मान्यता देण्यात यावी असेही आमदार हेमंत पाटील म्हणाले.कृष्णा खोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आणि माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख यांनी मागणी केल्यानुसार उजनी धरणातून २५ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळविण्यात यावे तसेच सहयाद्री माथ्यावर पडणारे १६८ टीएमसी पाणी कोकणात वाहून जाते. त्यापैकी १५५ टीएमसी पाणी बोगदा किंवा लिफ्टद्वारे मराठवाड्याकडे वळविण्यात आल्यास सिंचन अनुशेष भरून निघण्यास मदत होईल. तसेच राज्य शासनाने नदी जोड प्रकल्प हाती घेतला आहे.त्याचे कार्यालय नाशिक येथे असल्याने अनंत अडचणी येत आहेत हे कार्यालय मराठवाड्याचे टोक असलेल्या नांदेड येथे स्थापन करून येथे स्वतंत्र मुख्य अभियंत्याची नियुक्ती करण्यात यावी.आणि नांदेड येथे आयुक्तालय स्थापन करावे जेणे करून नांदेड जिल्ह्यातील किनवट सारख्या टोकाच्या तालुक्यातील नागरिकांना संभाजी नगरचा लांबचा पल्ला पार करून जावे लागणार नाही आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता येईल.तत्कालीन कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या कार्यकाळात हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे हळद संशोधन केंद्रास ६५ एकर जमीन आणि १०० कोटींचा निधी मंजूर केला होता तो प्रकल्प आता उत्तमरीत्या कार्यान्वित झाला असल्याची माहिती सुद्धा आमदार हेमंत पाटील यांनी सभागृहाला दिली तत्पूर्वी आमदार पाटील यांनी सभागृहात २६० नुसार आणलेल्या विधेयकास समर्थन देऊन महायुती सरकारच्या कार्याचे कौतूक केले.

# श्रीरामपूर वकील संघाच्या महिला उपाध्यक्षपदी ॲड.मुमताज बागवान यांची बिनविरोध निवड



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

नुकत्याच श्रीरामपूर वकील संघाची निवडणूक पार पडली असून या पदासाठी बर्याच वकिलांनी निवडणूकीसाठी फॉर्म भरले होते. परंतु निवडणूकीमध्ये एकच महिलाचा अर्ज आल्यामुळे ऍ्ड् मुमताज बागवान यांची महिला उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी श्रीरामपूर भारतीय जनता पार्टी शहर,अल्पसंख्याक आणि महिला मोर्चाच्यावतीने ऍ्ड मुमताज बागवान यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती यांना शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार अल्पसंख्या शहराध्यक्ष आसिफभाई पोपटीया, महिला मोर्चाचे सोशल मिडीया जिल्हाध्यक्ष कविता दुबे, सरचिटणीस अनिता बाबुराम शर्मा, वैशालीताई पवार, सुप्रिया धुमाळ, अलसबा बारसे, जिल्हा उपाध्यक्ष साजिदभाई शेख, मुनीरभाई शेख, उबेद शाह भारतीय जनता पार्टी शहर सरचिटणीस रवि पंडीत, शहर सचिव राजू धामोणे, अतुल देसर्डा यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी या श्रीरामपूर शहरात होणार्या बर्याच गोष्टींना उजाळा दिल्या. त्यांनी मी तुमच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभी राहिल. माझ्याकडून न्यायायिक व समाजहिताचे आज पर्यंत कार्य करत आले आहे व यापुढे ते मी उत्स्फुर्तपणे करत राहिल. मला मिळालेल्या पदाचा मी समाजहितासाठी यथोचित प्रयत्न करेन अशी त्यांनी यावेळी ग्वाही दिली.

# हत्राळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी टकले



**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील हत्राळ गावच्या उपसरपंचपदी परमेश्वर टकले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कविता साळवे यांनी रोटेशननुसार दिलेल्या राजीनामामुळे ती जागा रिक्त झाली होती, त्यामुळे निवडणूक निर्णयअधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी ही निवडणूक जाहीर केल्यानंतर २३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. सरपंच सौ.राधा दादा शिवणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत परमेश्वर टकले यांचा एकमेक अर्ज दाखल झाल्याने ही निवडणुक निवडणुक अधिकारी तथा ग्रामविकासअधिकारी श्रीमती रुपाली दहिफळे यांनी बिनविरोध निवड जाहीर केली.

यावेळी पॅनल प्रमुख दादा शिवणकर ,ग्रा.सदस्य राधा टकले,इदुंबाई पटारे,कचरु पटारे,कविता साळवे,पुजा टकले,नितीन काकडे, सर्व सदस्य,ग्रामपंचायत ऑपरेटर तुषार टकले,कर्मचारी भाऊसाहेब चन्ने,रोजगार सेवक कानिफ पटारे, भाऊसाहेब पटारे, अंकुश टकले,श्रीकांत टकले,गणपत क्षिरसागर,सुनिल आठरे, आप्पासाहेब काकडे,प्रविण मडके,सतिष काकडे,शेषराव टकले,संभाजी गणेशकर,सचिन पटारे,शिवाजी बळीद,मारुती साळवे,जगन्नाथ शिवणकर,प्रविण बळीद आदी उपस्थित होते. यावेळी सर्वांच्या वतीने परमेश्वर टकले यांचा सन्मान करुन शुभेच्छा दिल्या.

# आदिवासी व ओ.बी.सी.शेतकऱ्यांची फसवणूक: जय बिरसा ट्रायबल फार्मर प्रोड्युसर कंपनीवर गुन्हा नोंदवला

**भंडारा । प्रतिनिधी**

तुमसर तालुक्यातील चिंचोली येथील जय बिरसा ट्रायबल फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या संचालक व व्यवस्थापकांविरोधात आदिवासी व ओ.बी.सी. शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या कंपनीने शेतकऱ्यांना सबसिडीवर ट्रॅक्टर व शेतीसाठी आवश्यक साहित्यातील वाटपाचे आमिष दाखवून त्यांना फसवले.संपूर्ण प्रकरण ४ मे २०२२ रोजी सुरू झाले, जेव्हा जय बिरसा ट्रायबल फार्मर प्रोड्युसर कंपनीने लेंडेझरी येथे कार्यालय सुरू केले आणि चिचोली येथे शाखा उघडली. या कंपनीने आदिवासी शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर तसेच ओ.बी.सी. शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ट्रॅक्टर व शेतीसाठी लागणारे उपकरणे वाटप करण्याची योजना सुरू केली. मात्र, अनेक शेतकऱ्यांकडून १,३०,००० रुपये (आदिवासी शेतकऱ्यांसाठी) आणि २,६०,००० रुपये (ओ.बी.सी. शेतकऱ्यांसाठी) वसूल केल्यावरही त्यांना न ट्रॅक्टर मिळाले न उपकरणे. काही शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व उपकरणे दिली, पण इतर शेतकऱ्यांना त्यांच्या सबसिडीची रक्कम जमा झाल्याचे सांगून ट्रॅक्टर पासिंगसाठी २२,७०० रुपये घेतले. परंतु, ते शेतकऱ्यांना कोणतीही मदत केली नाही आणि मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली. या संदर्भात भंडारा पोलिस स्टेशन, तुमसर येथे गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक संदिप मिश्रा करत आहेत. तर, ज्यांना ट्रॅक्टर व शेतीसाठी उपकरणे न मिळालेली आहेत आणि पैसे भरले असल्यास, त्यांनी तक्रारीसह पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा येथे हजर राहून आपले बयाण नोंदवावे.

# एनएसएसचे श्रमसंस्कार शिबीर म्हणजे एक बिनभिंतीची शाळा-सुरेश आव्हाड

## धामणगाव येथे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**पाथर्डी । प्रतिनिधी**

समाजसेवेचा वारसा एन.एस.एस. च्या माध्यमातून निर्माण होतो. राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) हा फक्त एक कार्यक्रम नसून ती एक चळवळ आहे. एन.एस.एस.चे श्रमसंस्कार शिबीर म्हणजे स्वत:ला पारखण्याची, इतरांना समजून घेण्याची, निकोप मैत्री जपण्याची तसेच जात, पात, धर्म, पंथ याच्या पलीकडे जाऊन जगण्याची उमेद शिकविणारी बिनभिंतीची शाळाच होय, असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ड. सुरेशराव आव्हाड यांनी केले.

पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या एन.एस.एस. प्लस २ स्तर विभागाच्या वतीने धामणगाव (देवीचे) येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, जगदंबा देवी ट्रस्ट धामणगावचे अध्यक्ष रामराव पोटे, दत्तात्रय कुटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब मरकड, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, डॉ. अजयकुमार पालवे, डॉ. अरुण राख आदी उपस्थित होते.

सुरेशराव आव्हाड पुढे म्हणाले, एनएसएस मध्ये काम केलेला विद्यार्थी जीवनाचे समायोजन करण्यात यशस्वी होतो.श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून



गावातील प्रश्न समजावून घेऊन त्यावर उत्तर शोधण्याची एक संधी यानिमित्ताने विद्यार्थ्यांना मिळते. ग्रामीण भागातील समाजाचे होत चाललेले विभाजीकरण तसेच ग्रामीण भागातही होत असलेला बदल तसेच सोशल मिडीयाच्या होणाऱ्या दुष्परिणामाची चर्चाही याच माध्यमातून व्हायला हवी. म्हणूनच एन.एस.एस. हे एक स्वयंअध्ययन शिकविणारे एक व्यासपीठच होय, असे ते शेवटी म्हणाले. यावेळी दत्तात्रय कुटे यांनी ऑस्ट्रेलियाचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर उलगडले. रोहिणी खाडे, अक्षय गर्जे, मारिया शिरसे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या शिबीरात श्रमसंस्काराबरोबरच योगासने, ध्यानधारणा, बौद्धिक व्याख्याने आदी उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएसच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेखा चेमटे, सुत्रसंचालन प्रा. मन्सूर शेख तर आभार प्रा. अनिल नारखेडे यांनी मानले.

# पाथर्डी प्रीमियर लीगमध्ये नितीन घुगरे व नितीश नि-हाळी यांच्या शतकांनी जलवा

## स्व.माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक टी-२० स्पर्धा पर्व ४

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुका टी-२० क्रिकेट असोसिएशन, एस.व्ही.नेट, व मा. प्रतापकाका ढाकणे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक पाथर्डी प्रीमियर लीग (पर्व ४) स्पर्धेत काल झालेल्या रोमांचक सामन्यांत नितीन घुगरे व नितीश नि-हाळी यांनी शतकी खेळी करून प्रेक्षकांची मने जिंकली.




दराडे आर्टस् संघाने शिरसाट स्पोर्ट्स संघावर ३३ धावांनी विजय मिळवला. दराडे संघाने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २०७ धावांचा डोंगर उभारला. नितीन घुगरेने अवघ्या १२० धावा करत संघासाठी महत्त्वाची खेळी केली, तर दीपक टेकेने ३७ व आदेश मोरेने १५ धावा करत सहकार्य केले. शिरसाट स्पोर्ट्सकडून ऋषि लटपटेने ३ व अक्षय शिरसाटने २ बळी मिळवले.

प्रत्युत्तरादाखल शिरसाट स्पोर्ट्स संघाने २० षटकांत १७४ धावांवर आपला डाव संपवला. अक्षय शिरसाटने ४३, महेश बरवेने ३१ व ऋषि चौरेने ३९ धावा केल्या. दराडे संघाकडून रुद्रा खेडकर व आदेश मोरे यांनी प्रत्येकी ३ बळी मिळवत संघाच्या विजयात मोठे योगदान दिले. सामनावीर पुरस्कार नितीन घुगरे याला रुद्रा स्पोर्ट्सचे संचालक पवन दहिफळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

दुपारच्या सामन्यात सोहम किंग्सने क्रिकेट स्टार करंजी संघावर एकतर्फी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करत सोहम किंग्सने २०४ धावांचे लक्ष्य उभारले. नितीश नि-हाळी याने तडाखेबाज खेळ करत ५९ चेंडूत १३० धावांची खेळी साकारली. जुबेर शेखने २१ धावा जोडल्या. करंजी संघाकडून गणेश अकोलकरने २ बळी घेतले.

करंजी संघ ७९ धावांत गारद झाला. सचिन राठोडने १७ व अमन पठाणने १२ धावा केल्या. सोहम किंग्सकडून नितीश नि-हाळी व तारा जोशी यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. सामनावीर पुरस्कार १३९ धावा करणाऱ्या नितीश नि-हाळी याला न्यू विशाल संघाचे खेळाडू रफिक खलिफा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# तिसगाव संघाचा बलाढ्य विजय तर दराडे आर्टस् संघ चुरशीची लढतीत विजयी

## स्व.माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक

**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुका टी-२० क्रिकेट असोसिएशन एस.व्ही.नेट व मा.प्रतापकाका ढाकणे मित्र मंडळ आयोजित स्व.माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक पाथर्डी प्रिमियर लिग पर्व ४ मध्ये काल रोमहर्षक सामन्यात तिसगाव वारीयर्स संघाकडून क्रिकेट स्टार संघ एकतर्फी पराभूत.तर दुपारी झालेल्या चुरशीच्या सामन्यात दहीफळे इलेक्ट्रिकल्स व रुद्रा स्पोर्ट्स संघाकडून हॉटेल प्रेम संघ पराभूत.सकाळचा सामना तिसगाव वारीयर्स विरुद्ध क्रिकेट स्टार करंजी यांच्या झाला.तिसगाव संघाने प्रथम नाणेफेकी जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.व १० षटकात १३० धावांचे बलाढ्य लक्ष करंजी संघसमोर उभा केले.तिसगाव संघाकडून अर्जुन माने (५८), आतिष नि-हाळी (२५), कैफ शेख (२९) धावा केल्या. तर गोलंदाजीत करंजी कडून कनिफ चव्हाण ,शाम जाधव, रमेश मोरे यांनी प्रत्येकी एक बळी मिळवले.क्रिकेट स्टार करंजी संघ फलंदाजीला आल्यानंतर अवघ्या ६२




धावांमध्ये आटोपला.करंजी संघाकडून गणेश अकोलकर (१६ ),प्रशांत टाकरे यांनी (१५) धावा केल्या.गेलंदाजीला आलेल्या तिसगाव संघाकडून करण म्हस्के याने ३ बळी मिळवत तिसगाव संघाला एकहाती विजय मिळवून दिला.सामनावीर पुरस्कार अर्जुन माने याला देण्यात आला.दुपारी झालेला सामना दहीफळे इलेक्ट्रिकल्स रुद्रा स्पोर्ट्स विरुद्ध हॉटेल प्रेम यांच्यात झाला.रुद्रा स्पोर्ट्स संघाने प्रथम नाणेफेकी जिंकून प्रथम फलंदाजी चा निर्णय घेतला.हॉटेल प्रेम संघाकडून गहिनीनाथ दादा शिरसाट यांनी एकाकी झुंज देत (३७) धावा केल्या.व पप्पू पंडित याने (२२) धावा करत ८५ धवांचे माफक लक्ष रुद्रा स्पोर्ट्स समोर ठेवले.रुद्रा स्पोर्ट्स कडून प्रणव सोनटक्के याणे ३आकाश वाघमारे यांनी २ बळी मिळवले.प्रेम हॉटेल कडून गोलंदाजीत वैभव सोनपुरे याने २ बळी मिळवले.दहिफळे इलेक्ट्रिकल्स ने ८७ लक्ष ठेऊन मैदानात आल्यावर गणेश ढोले यांनी ३६ धावांची तडाखेबाज खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.सामनावीर पुरस्कार आकाश वाघमारे याला देण्यात आला .प्रमुख पहाणे म्हणून राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित भैय्या पुंड उपस्थित होते

आज होणारे सामने शिरसाट स्पोर्ट्स विरुद्ध दराडे आर्टस् , दुपारी होणारा सामना सोहम किंग्स विरुद्ध क्रिकेट स्टार करंजी.

# मधुमेहींसाठी योग व प्राणायाम शिबिराचे आयोजन

**संगमनेर । प्रतिनिधी**


संगमनेर येथील योगतज्ञ डॉ.सुधाकर पेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली मधुमेहासाठी योग व प्राणायाम शिबाराचे भव्य आयोजन २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत सकाळी ६.३० ते ७.३० या वेळात भंडारी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले.

महाराष्ट्र हा मधुमेही रुग्णांचा झाला आहे.अगदी लहान वयापासून ते वृद्ध व्यक्तीपर्यंत कुणालाही मधुमेह होऊ शकतो. वाळवीसारखे शरीर जीर्ण करण्याचे काम करतो.योगवर्धिनी,महेश जेष्ठ नागरिक संघ,महेश नागरी सहकारी पतसंस्था,रोटरी क्लब संगमनेर,संगमनेर साहित्य परिषद,आधार फौंडेशन आदि संघटनांच्या वतीने मधुमेह होऊ नये म्हणून व झालाच तर तो कसा नियंत्रणात ठेवायचा या बाबत योगतज्ञ डॉ.सुधाकर पेटकर हे मार्गदर्शन करणार आहेत.




यावेळी मोफत रक्तशर्करा तपासणी तसेच मधुमेहींसाठी आहार याचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तरी सर्वांनी या मोफत योग व प्राणायाम शिबिराचा फायदा घ्यावा असे आवाहन महेश जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गणेश बाहेती,सुरेश जाजू,महेश नागरी पतसंस्थेचे चेअरमन विशाल नावंदर,योगवर्धिनीचे डॉ. अलका पेटकर,शांताराम गजे,संगमनेर साहित्य परिषदेचे अध्यक्ष अरविंद गाडेकर,सचिव ज्ञानेश्वर राक्षे,रोटरीचे अध्यक्ष साईनाथ साबळे, आधारचे सुखदेव इल्हे,बाळासाहेब पिंगळे सर आदींनी केले आहे.दरवर्षी सातत्याने चालणाऱ्या या शिबिराचे यंदाचे २७ वे वर्ष आहे.

# रोटरी क्लब तर्फे शीतशव पेटीचे डॉ.सुरेश साबू यांच्या हस्ते लोकार्पण



**बीड (प्रतिनिधी):** मृतदेहावर अंत्यसंस्कार वेळेत होणे आवश्यक असते, पण काही कारणाने अंत्यसंस्काराची वेळ लांबते. अशा वेळी मृतदेह शीतगृहात नेऊन ठेवायची वेळ येते आणि अंत्यसंस्कारासाठी तेथून मृतदेह पुन्हा घरी घेऊन आणावा लागतो, या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आता बीड मध्ये देखील 'शव शीत पेटी' सेवा उपलब्ध झाली आहे. डिस्ट्रीक्ट ३१३२ चे डिस्ट्रीक्ट गर्व्हनर डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते मोंढा रोड येथील अमरधाम मध्ये याचे लोकार्पण नुकतच करण्यात आले.

# डांगी जनावरंच्या प्रदर्शनात धोंडिबा बिन्नर यांचा 'पोपट' वळू ठरला चॅम्पियन



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अकोले तालुक्यातील राजूर येथे आयोजित करण्यात आलेल्या देशी-विदेशी व डांगी जनावरांच्या प्रदर्शनात केळी रुम्हणवाडी (ता.अकोले) येथील धोंडिबा किसन बिन्नर यांचा पोपट वळू चॅम्पियन ठरला. तर इगतपुरी तालुक्यातील धामणी येथील भाऊसाहेब राजाराम घोटे यांचा वळू उपविजेता ठरला.

राजूर ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि जिल्हा परिषदेचा पशुधन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजूर येथील खंडोबा मंदिराच्या टेकडीवर डांगी जनावरांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभव पिचड, पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे आदी उपस्थित होते. प्रदर्शनासाठी अहिल्यानगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यातील डांगी तसेच देशी-विदेशी जनावरे खरेदी विक्रीसाठी शेतकऱ्यांनी आणली आहेत. जनावरे खरेदीसाठी व्यापारी वर्गही मोठ्या संख्येने दाखल झाला आहे. जनावरांसाठी यावर्षी वेगवेगळ्या तालुक्यातील ९८ शेतकऱ्यांनी आपली डांगी जनावरे रिंगणात उतरवली होती.

# राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सोमनाथ सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची घेतली सांत्वनपर भेट

**परभणी | प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सोमवारी (दि. २३) परभणीतील दुर्दैवी घटनांमध्ये मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीतील दिवंगत नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली.

यावेळी प्र. निवासी उपजिल्हाधिकारी दत्तू शेवाळे व तहसीलदार संदीप राजपुरे उपस्थित होते.ना. बोर्डीकर यांनी सूर्यवंशी कुटुंबीयांची व्यथा जाणून घेतली आणि शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असे आश्वासन दिले. घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर त्यांनी परभणीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि पुतळा परिसरातील घटनास्थळाची पाहणी केली. विजय वाकोडे यांच्या घरी राहुलनगर येथे भेट देताना, राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, जिल्ह्याने एक लोकनेता गमावला आहे. त्यांच्या सक्रिय योगदानामुळे समाजात मोठा प्रभाव होता, आणि त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. श्रीमती बोर्डीकर यांनी दोन्ही दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबीयांना या कठीण प्रसंगात धीर दिला.



# यवतजवळ एसी कंटेनरला भीषण आग,क्लिनरचा मृत्यू

**शिरूर | रमेश बनसोडे**

पुणे-सोलापूर महामार्गावर यवत गावाजवळ एक भीषण अपघात घडला. एसी मालवाहतूक करणाऱ्या कंटेनरला अचानक आग लागून कंटेनरमधील सारा माल जळून खाक झाला आहे. या दुर्घटनेत कंटेनरचा क्लिनर प्रिन्स राजा स्वरूप परमाल (वय २३, रा. डोंगर कल्ला, तालुका पाली, जिल्हा ललितपूर, उत्तर प्रदेश) याचा मृत्यू झाला.

ही घटना २४ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली. चेन्नईहून भिवंडीकडे जात असलेला आयशर कंपनीचा कंटेनर यवत जवळ पोहोचल्यावर त्याला अचानक आग लागली. चालकाने क्लिनरला उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र गाढ झोपेत असल्याने क्लिनर आतच अडकून पडला. चालकाने उडी मारून स्वतःचा जीव वाचवला, पण क्लिनरचा होरपळून मृत्यू झाला.



आगीत कंटेनरमधील सर्व एसी माल जळून नष्ट झाला. घटनास्थळी अग्निशामक बंब आणि ग्रामस्थांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु आग आटोक्यात आणण्यास उशीर झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक वाघ, प्रमोद शिंदे आणि सचिन काळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. उद्योजक संदीप दोरगे यांनी तत्काळ पाण्याचा टँकर आणि क्रेन बोलावून आग आटोक्यात आणण्यासाठी मोठी मदत केली. आबा प्रल्हाद दोरगे, अमर चोरगे, विक्रांत दोरगे, धीरज सोनवणे, समीर अन्सारी आदी ग्रामस्थांनीही आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. कंटेनरला आग कशामुळे लागली, याचा शोध पोलीस घेत असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# शहापूरमध्ये ज्वेलर्सच्या दुकानावर गोळीबार,सेल्समनचा मृत्यू

**ठाणे | प्रतिनिधी**

शहापूर तालुक्यातील महालक्ष्मी ज्वेलर्सच्या दुकानावर शनिवारी रात्री गोळीबाराची घटना घडली. या हल्ल्यात दुकानातील सेल्समन दिनेश चौधरी यांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार करून त्यांच्या जवळील बॅग खेचून नेण्याचा प्रयत्न केला.




शनिवारी रात्री सव्वानऊ वाजता दिनेश चौधरी दुकान बंद करून घरी निघत होते. त्याचवेळी एका दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. गोळी छातीत लागल्याने दिनेश खाली कोसळले. हल्लेखोर बॅग खेचण्याचा प्रयत्न करत होते, मात्र त्यावेळी एका भाजी विक्रेती महिलेने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोरांनी त्या महिलेलाही धमकावले.

दिनेश चौधरी यांना तातडीने शहापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना रविवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला.या घटनेमुळे शहापुरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांना बंद ठेवून शहापूर पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढला. ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश शहा, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष गौरीशंकर अग्रवाल आणि अन्य व्यापारी संघटनांनी हल्लेखोरांना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

शहापूर पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. घटनेने व्यापारी वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून आरोपींना लवकरात लवकर पकडण्यासाठी पोलीस प्रशासनावर दबाव वाढला आहे.

# जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी अपात्र लाभार्थ्यांचे सत्याग्रह आंदोलन




**गंगाखेड | प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार योजना, इंदिरा वृद्धापकाळ योजना आणि श्रावण बाळ योजनेतून वंचित झालेल्या लाभार्थ्यांनी जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी सोमवार, २३ डिसेंबर रोजी तहसील कार्यालयासमोर सत्याग्रह (धरणे) आंदोलन केले. यावेळी त्यांनी तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे यांना निवेदन सादर केले. शासनाच्या या योजनांतर्गत अपंग, विधवा, परित्यक्ता आणि निराधार लाभार्थ्यांना लावलेल्या जाचक अटींमुळे अनेक गरजूंना लाभ मिळत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. विशेषतः दारिद्र्यरेषेखालील अर्जदार आणि कॅन्सरग्रस्त लाभार्थ्यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात आल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. या अटी त्वरित रद्द कराव्यात आणि सर्व गरजू लाभार्थ्यांना योजना उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

सत्याग्रह आंदोलन २६ डिसेंबरपर्यंत सुरू राहील, त्यानंतर मागण्या मान्य न झाल्यास २७ डिसेंबरपासून आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या आंदोलनात शेकापचे भाई गोपीनाथ भोसले, कॉ. योगेश फड, निलाकांत जाधव, मारोतराव भिसे यांच्यासह असंख्य अपात्र लाभार्थ्यांचा सहभाग होता.

# गुरुकुल विद्या निकेतनच्या आतिश तूरकची राज्यस्तरीय निवड




**वर्धा | प्रतिनिधी**

२० डिसेंबर २०२४: देवळी येथील गुरुकुल विद्या निकेतनच्या आतिश रत्नाकर तूरक याने विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत आपल्या कौशल्याने १७ वर्षे वयोगटातील हस्तकला प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

आस्टे डू आखाडा या खेळामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करत आतिशने आपली गुणवत्ता सिद्ध केली. आपल्या यशाचे श्रेय त्याने आई-वडील, मार्गदर्शक शिक्षक उल्हास वाघ सर, अनुप कपूर सर, तसेच गुरुकुल विद्या निकेतनचे मुख्याध्यापक योगेश ढोरे सर यांना दिले आहे.

गुरुकुल विद्या निकेतनसाठी ही अभिमानास्पद गोष्ट असून, शाळेच्या वतीने आतिशच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या गेल्या आहेत. राज्यस्तरीय स्पर्धेतही तो आपल्या कामगिरीने शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करेल, अशी सर्वांना खात्री आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे समवेत योग शिक्षकांची नागपुरात चर्चा

**गेवराई (प्रतिनिधी):** नागपूर येथील विधानभावनात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याशी महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार व इतर पदाधिकाऱ्यांनी योग शिक्षकांच्या मागण्यांबाबत गुरुवार, दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी चर्चा केली.

महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्यावतीने गेल्या काही वर्षापासून राज्यातील योग शिक्षकांच्या मागण्या शासनाकडे वेळोवेळी मांडण्यात येत आहेत. संघटनेचे संस्थापक डॉ.मनोज निलपवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्य व जिल्हा कार्यकारीणीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा केली. त्यांनी योग शिक्षकांच्या मागण्या विधिमंडळात मांडणार असल्याचे सांगितले. तसेच योगशिक्षक हे ग्रामीण व शहरी भागात नागरिकांच्या आरोग्यसेवेचे महत्वपूर्ण कार्य करतात, असे प्रतिपादन केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतलेल्या समितीमध्ये संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, संघटनेचे राज्य कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, नागपूर विभागप्रमुख विनायक बारापत्रे, राज्य महासचिव अमित मिश्रा, आरोग्यवर्धिनीचे राज्य अध्यक्ष गजानन चौधरी, राज्य उपाध्यक्षा सुपर्णाताई पाल, राज्य उपाध्यक्ष लताताई होलगरे,नागपूर जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम थोटे, महासचिव मनोहर पाल, जिल्हा कोषाध्यक्ष उषाताई हिंदारिया, जनसंपर्क अधिकारी कृणाल महाजन, योग शिक्षण समितीचे अतुल गाळेराव यांचा समावेश होता.

# रणजीत चव्हाणांची रयत क्रांती संघटनेच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**माळशिरस | प्रतिनिधी**

रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत आणि प्रदेशाध्यक्ष दीपक राव भोसले यांच्या सूचनेनुसार रणजीत चव्हाण यांची सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राज्य प्रवक्ते राहुल बिडवे यांनी निवडीचे पत्र चव्हाण यांना सुपूर्द केले. या निवडीमुळे माळशिरससह सोलापूर जिल्ह्यात रयत क्रांती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.

रणजीत चव्हाण हे गेल्या दहा वर्षांपासून शेतकरी चळवळींमध्ये सक्रिय असून ऊस आंदोलन, दूध आंदोलन, पाण्यासाठी आंदोलन आणि रास्ता रोको यांसारख्या लढ्यांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

> **“माळशिरस तालुका हा क्रांतिकारकांचा तालुका आहे. या तालुक्याने माझी ओळख संपूर्ण राज्यात निर्माण केली. त्यामुळे तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना आम्ही ताकद देणार आहोत. राज्यात सरकार आमचे आहे, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आरपारची लढाई लढणार.**
>
> **– आ. सदाभाऊ खोत, रयत क्रांती संघटना**

शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी नेहमीच लढणाऱ्या चव्हाण यांच्यावर आमदार सदाभाऊ खोत यांनी विश्वास ठेवून ही जबाबदारी सोपवली आहे. निवडीनंतर रणजीत चव्हाण म्हणाले, माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात संघटनेचा विस्तार करण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू. शेतकरी, शेतमजूर आणि गावगाड्याच्या हक्कांसाठी रस्त्यावरची लढाई लढण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही. यावेळी राज्य प्रवक्ते राहुल बिडवे, गणेश कोडक, बापू वावळ, सुधाकर पांढरे, गजानन माने आणि अक्षय चव्हाण आदी उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा

## सौ.गिताभाभी पवार यांच्या हस्ते एलसीडी टीव्हीसह फळ वाटप

**गेवराई (प्रतिनिधी):** गेवराई विकास आघाडी प्रमुख युवानेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देवून सौ.गीताभाभी बाळराजे पवार व सौ.भाग्यश्री लक्ष्मण पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दि.२१ डिसेंबर २०२४ रोजी शहरातील ताकडगाव रोड, गेवराई येथील दिव्यांग शाळेत एलसीडी टीव्ही भेट देत विद्यार्थ्यांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.

गेवराई शहरातील मुकबधीर व मतिमंद निवासी विद्यालययात बाळराजे पवार मित्र मंडळाच्या पुढाकाराने अनावश्यक खर्चाला फाटा देत बाळराजे पवार यांचा दिव्यांगांच्या निवासी शाळेत एलसीडी टीव्ही सप्रेम भेट देत विद्यार्थ्यांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी सौ. रत्नमाला मोटे, नितीन शेटे, राम पाटेकर, दिनेश भंडारी, इम्रान पठाण, आसेफ शेख, राम सोलट, दत्ता गिरी, सोहेल शेख, पवन दहिवाळ सह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्यावतीने संयोजकांचे आभारपत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले.

# रामानुजन यांनी जागतिक पटलावर गणिताचा ठसा उमटविला-जगताप

**बीड (प्रतिनिधी):** स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात गणित दिवस साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना विद्यासभा उपाध्यक्ष तथा पर्यवेक्षक उमेश जगताप यांनी सांगितले की,भारतीय ज्ञान परंपरा ही खुप प्रगल्भ आहे. जगाला शुन्य देण्यारी भारतीय ज्ञान कक्षा खुप खोल आहे. या सर्व प्राचीन ज्ञानाची धुरा श्रीनिवास रामानुजन यांनी समर्थपणे पेलावली. जगातील अनेक विद्वानांनी रामानुजन यांचे मार्गदर्शन घेतले. जागतिक पटलावर गणिताचा ठसा रामानुजन यांनी उमटवला. असे प्रतिपादन जगताप यांनी केले.मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गणिताच्या काही विशेष बाबी आपल्या खुमासदार शैलीत सांगितल्या.कार्यक्रमाची विषय मांडणी करताना सौ. माधवी डोळे यांनी गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सविस्तर दिली. त्यांनी अनेक गणिताचे सिद्धांत मांडले असे प्रतिपादन डोळे यांनी केले.यावेळी कु. श्रेया कचवाल व चि. कैवल्य तालखेडकर या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीचित्रांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या दिनाच्या निमित्ताने विद्यालयात गणितोपयोगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या साहित्यांची, उपकरणांची प्रदर्शनी भरवली गेली.व्यासपीठावर याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, गणित प्रमुख माधव राऊत, सौ. माधवी डोळे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. दीपा परोपकारी यांनी केले, सूत्रसंचालन शरद ढवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन माधव राऊत यांनी केले.रमण कुलकर्णी यांनी कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता केली.

# महाराष्ट्रातील महिला खेळाडू ह्या उद्याच्यों शिल्पकार-स्त्रिरोगतज्ज्ञ डॉ.अश्विनी भोंडेकर

## भंडारा येथे ६८ वी महाराष्ट्र राज्य महिला बॉल बॅडमिंटन स्पर्धा यशस्वी

**भंडारा । प्रतिनिधी**

कोणतीही परिक्षा देऊन अधिकारी होता येते. मात्र नामवंत खेळाडू होण्यासाठी अख्खं आयुष्य जिवन झिजवावे लागत असते. यास्पर्धे दरम्यान उपस्थित असलेले मार्गदर्शक, गुरू व खेळाडू एकत्र आहेत. यावरून असे वाटते की, भगवान साक्षात अवतरले आहे. खेळाडूंचा उत्साह वाढविण्यासाठी हार के बाद ही जित है, व हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब एक दिन....हे गित सादर केले. खेळाडूंनी आलेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास विजय संपादन करावे. म्हणून महाराष्ट्रातील महिला खेळाडू ह्या उद्याच्या भावी शिल्पकार आहेत. असे प्रतिपादन स्त्रिरोगतज्ञ डॉ. अश्विनी नरेंद्र भोंडेकर यांनी केले.

त्या खात रोड येथील लालाजी लॉन येथे स्व. संध्या राजेंद्र भांडारकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ, दि महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन व न्यू बॉल बॅडमिंटन असोसिएशन भंडाराच्या वतीने ६८ वी महाराष्ट्र राज्य महिला बॉल बॅडमिंटन स्पर्धेत मार्गदर्शन करतांना बोलत होत्या.

स्पर्धेचे उद्घाटन स्त्रिरोगतज्ञ डॉ. अश्विनी भोंडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक निलकंठराव रणदिवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. पि. के. पटेल, महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे महासचिव अतुल इंगळे, विजय पळसकर, ऋषिकेश पापडकर, महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे सहसचिव प्रा. हरिश काळे, सल्लागार राजेश्वर खंगार, निरिक्षक श्रीराम पवार, डॉ. अमरकांत चकोले, वंदना ईश्वरकर, विलास केजरकर भारतीय बॉल बॅडमिंटन फेडरेशनच्या सदस्या रूपाली पापडकर, मनिष इंगोले, डॉ . दीपक सोनटक्के, विजू मुळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला माल्यार्पण व दिप प्रज्वलित करून उद्घाटन करण्यात आले. ६८ वी महाराष्ट्र राज्य महिला बॉल बॅडमिंटन स्पर्धेत पुणे महानगर, अमरावती महानगर, पुणे, वर्धा, चंद्रपूर, मुंबई, भंडारा, नागपूर, रायगड, नवी मुंबई, ठाणे, जळगाव, हिंगोली, गडचिरोली, अकोला, कल्याण डोंबिवली, अमरावती येथील



जवळपास २५० च्यावर खेळाडू, पंच, व्यवस्थापक व मार्गदर्शक तसेच दि महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन व न्यू बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.उपस्थित मान्यवरांनी विविध मार्मिक उदाहरण देऊन मार्गदर्शन केले.बक्षिस वितरण दसरा मैदान येथे महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे महासचिव अतुल इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी गणेशपुर ग्राम पंचायत सदस्य शरदराव भांडारकर, मंजुषा खापरे, न्यू बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दिपक सोनटक्के, सचिव राजेंद्र भांडारकर, उपाध्यक्ष राजू मुन व पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी स्पर्धक खेळाडूंना व चमूला ट्राफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच बॉल बॅडमिंटन महिला महाराष्ट्र संघाची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव राजेंद्र भांडारकर व प्रास्ताविक श्रीराम पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार दीपक सोनटक्के व उपाध्यक्ष राजू मुन यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कोषाध्यक्ष शशांक राऊत, शालिनी मडामे, रितिका चातोळे, गणेश मोहरकर, तोषित वाडिभस्मे, हर्शल निर्वाण, भुषण नागोसे, राम भांडारकर, चिन्मय केळकर, अरहम शेख, अथर्व तुमसरे, आर्यन ठाकरे, राजू मेश्राम, शंतनु भांडारकर, अनुज बेले, लोकेश नेहरकर, अर्थव तऱ्हेकर, वेदांत भाजीपाले, श्रृती भांडारकर, गुंजन बन्सोड, अमित हटवार, मुकेश लक्षणे व दि महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन व न्यू बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## राज्यस्तरीय मुख्याध्यापक शैक्षणिक संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-प्रा.जे.एम.पैठणे

**बीड (प्रतिनिधी):** मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२८ आणि २९ डिसेंबर रोजी लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनास (वार्षिक अधिवेशन) अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य जे.एम.पैठणे यांनी केले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे ६१ वे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन ( वार्षिक अधिवेशन) लातूर शहरातील औसा रोड येथील थोरमोटे लॉन्स येथे दिनांक २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या अधिवेशनात तज्ञांची व्याख्याने व विविध विषयावर प्रश्नावर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. तरी या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक/प्राचार्य बंधू-भगिनींनी उपस्थित राहून शासन स्तरावर प्रलंबित विविध शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी मुख्याध्यापक संघटनेची एकजूट दाखववावी असे आवाहन (विभागीय सचिव मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष

प्राचार्य जे.एम.पैठणे,विष्णुपंत रसाळ सर (जिल्हा सचिव बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ) , मार्गदर्शक भाऊसाहेब बोबडे सर , उपाध्यक्ष शंकर पवार , गणेश घोडके, सहसचिव विनयकुमार केंडे , कोषाध्यक्ष आप्पासाहेब येवले , सहकोषाध्यक्ष रमेशसिंह देसुरकर , सदस्य भीमराव सावंत , प्रदीप गाडे दादासाहेब खोले, गोविंद चव्हाण ,राजाभाऊ घुंबार्डे , अरुण शेप , सुनील कांबळे, सौ . सरला बिंदू , तालुकाध्यक्ष बीड लक्ष्मण इंगोले, गेवराई भक्तराज पौळ ,शिरूर अभिमन्यू घरगिने , वडवणी दत्तात्रय कानडे ,आष्टी राजू आजबे, अंबाजोगाई विलास सोमवंशी , परळी बळवंत चव्हाण , पाटोदा विकास वराट , माजलगाव लक्ष्मण जगताप ,केज सुशील कुमार गायकवाड आणि तालुका सचिव बीड अनिल काळे, गेवराई कल्याण राऊत , शिरूर बाबुराव जायभाये ,वडवणी धुराजी राऊत ,आष्टी तुकाराम डोके , अंबाजोगाई धनंजय शिंदे, परळी रमेश गीते ,पाटोदा अशोक पवार , माजलगाव चंद्रशेखर तौर, केज दिगंबर नागरगोजे यांच्यासह बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सर्व सदस्य यांनी केले आहे.

## सौ.के.एस.के महाविद्यालयात डॉ.रोकडे यांचे व्याख्यान संपन्न

**बीड (प्रतिनिधी):** येथील सौ. के. एस. के. महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त गणित विभागातर्फे जे. ई.एस. कॉलेज, जालना येथील गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश रोकडे यांचे Importance of Mathematics Day and mathematics in our life या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. क्षीरसागर हे होते.



आपल्या व्याख्यानात डॉ. गणेश रोकडे यांनी गणित दिवसाचे महत्त्व सांगून थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांचे गणितातील कार्य विशद केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना त्यांनी, गणिताचे जीवनाशी निगडित असलेल्या विविध क्षेत्रातील महत्त्व पटवून सांगितले आणि त्याचबरोबर आर्थिक, शेअर मार्केट, बचत, मेडिकल आणि नवीन तंत्रज्ञानासाठी गणितातील विविध सिद्धांतांचा वापर कसा केला जातो याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी गणित हा विषय जीवनामध्ये किती महत्त्वाचा आहे यावर प्रकाश टाकला आणि विविध विषयातील संशोधनामध्ये गणिताचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. गणित विषयाची गोडी विद्यार्थ्यांनी कशी निर्माण करावी याविषयीही त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे पदव्युत्तर संचालक डॉ. ए. एस. खान, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, प्रा. उमेश बोबडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणित विभाग प्रमुख डॉ. शंकर राऊत यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. गजानन श्रीमंगले यांनी केले. या व्याख्यान कार्यक्रमासाठी गणित विभागाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## रायगडावर स्वच्छतेची शपथ घेऊन राजस्थानीची शैक्षणिक सहल संपन्न

**बीड (प्रतिनिधी):** येथील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल रायगड-प्रतापगड- दिवेआगर - महाबळेश्वर- जेजुरी-मोरगाव-नारायणपूर (प्रतिबालाजी) ई. ठिकाणी उत्साहात, आनंदाने आणि सुखरूप जाऊन आली. शैक्षणिक सहल मार्गस्थ करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष विष्णूदास तापडिया संस्थेचे कोषाध्यक्ष श्री गंगाबिशन करवा ज्येष्ठ संचालक श्री राधेश्याम कासट व श्री अशोक मंत्री विद्यालयाचे मुख्याध्यापक गिरीष सोहनी व पालन विद्यालयातील सहकाऱ्यांसह सहल मार्गस्थ करण्यात आली. सकाळी रोप वें चां आनंद घेत विद्यार्थी रायगडावर शिवाजी महाराज की जय या जयघोशात पोहोचली त्या ठिकाणी पोहोचल्यावर विद्यार्थ्यांना या किल्ल्याची अचूक माहिती व्हावी यासाठी शाळेने एक गाईड लावले होते. अतिशय सुंदर अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या ठिकाणी शाळेने एक नवीन उपक्रम हाती घेतला होता रायगड स्वच्छतेचा या ठिकाणी सर्वांनी मिळून येथे जो अनावश्यक कचरा पडला होता तो गोळा केला. व स्वच्छतेची प्रतिज्ञा या ठिकाणी शिवरायांना साक्षी मानून घेतली या ठिकाणी बऱ्याच शाळा आपले विद्यार्थी घेऊन सहलीसाठी आल्या होत्या त्यांनीही आमच्या या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला



व शाळेचे कौतुक सुद्धा केले इतिहासात प्रथमच रायगडावर स्वच्छतेचे बॅनर लावले होते ते म्हणजे राजस्थानी विद्यालयाने. यानंतर या किल्ल्यावर हत्तीखाना, बाजारपेठ विद्यार्थ्यांनी पाहिली. येथून दिवेआगार येथे मुक्काम करून सकाळी समुद्रकिनारी विद्यार्थ्यांनी समुद्राचा नवीन अनुभव घेतला बारीक अशी वाळू खार पाणी विद्यार्थ्यांनी यात खूप आनंद घेतला बनाना राईड, ड्रॅगन राईड, स्कूटर राईड, बोटेतून समुद्रदर्शन विद्यार्थ्यांनी केले. व तेथून सहल सुवर्ण गणेश मंदिर दिवेआगार येथे दर्शन केले. व सहलिने प्रतापगडाच्या दिशेने रवाना झाले घनदाट अशी झाडी सह्याद्रीच्या रांगा विद्यार्थ्यांनी प्रथमच पाहिल्या होत्या . डोंगरावर जात असताना खाली बघितले तर आभाळ दिसत असे डोळ्याचे पारणे फिटेल असे निसर्ग दर्शन यानंतर आम्ही पोहोचलो प्रतापगडाच्या पायथ्याशी येथे शाळेने गाईड लावला होता त्याने पायथ्यापासून पूर्ण गडाची हे इतंभूत माहिती विद्यार्थ्यांना दिली. खान आणि शिवाजी महाराजांची भेट कोठे झाली ते ठिकाण दाखवले त्याचबरोबर, कडेलोट, भवानी मातेचे मंदिर, सरसेनापती हंबीरराव मोहिते पाटील यांची तलवार सर्वांचा विद्यार्थ्यांनी जवळून अनुभव घेतला त्याचबरोबर संपूर्ण किल्ल्याची पहाणी केली. प्रतापगडाच्या पायथ्याशी मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सहल महाबळेश्वरच्या दिशेने निघाली.महाबळेश्वर येथे विद्यार्थ्यांना सर्व पॉईंट दाखवण्यात आले इको पॉईंट ,मालकोलम पॉईंट, असे पॉईंट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले महाबळेश्वर येथील प्राचीन अशामहादेव मंदिराचे दर्शन केले त्याचबरोबर, गोमुखेतून पाच नद्यांचे पाणी कसे येते हे मंदिरात जाऊन विद्यार्थ्यांना दाखवले. त्यानंतर सहल वाईच्या दिशेने मार्गक्रमण केला चतुर्थी असल्याकारणाने योगायोगाने वा वाईच्या महागणपतीचे दर्शन झाले. त्यानंतर सुंदर अशा गंधर्व रिसॉर्ट मध्ये विद्यार्थ्यांनी जेवणाचा आनंद घेतला व थोडी मस्ती केली.त्यानंतर सहल नारायणपूर प्रति बालाजी या ठिकाणी पोहोचली वेंकटरमना गोविंदा च्या गजरात विद्यार्थ्यांनी बालाजीचे दर्शन केले. त्यानंतर सहल जेजुरीच्या दिशेने निघाली मंदिर बंद होण्यासाठी अवघे २० मिनिट राहिले असताना विद्यार्थ्यांनी पार्किंग पासून थेट मंदिरापर्यंत पंधरा मिनिटात पोहोचले येळकोट येळकोट जय मल्हार जय जय घोषात विद्यार्थ्यांनी खंडेरायाचे दर्शन केले.यानंतर सहल मोरगावच्या दिशेने निघाले चतुर्थी असल्याकारणाने आज दुसऱ्या आणि अष्टविनायका पैकी एक मोरगावचा मोरेश्वर या गणपतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी मनोभावे केले व यानंतर परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता सहल सुखरूप शाळेत पोहोचली.सहल यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर, सहल प्रमुख तंबरे सर, सहल उपप्रमुख दोडे सर, गांधी सर गरुड मॅडम, लोणकर मॅडम यांनी प्रयत्न केले.

## पोलिसांनीच केली सूर्यवंशी यांची हत्या : राहुल गांधी

**परभणी । प्रतिनिधी**

स्व. सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू हा पोलिस कोठडीत मारहाणीमुळेच झाल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. सोमवारी परभणीत सूर्यवंशी कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर गांधी यांनी माध्यमांशी संवाद साधला.

खा. राहुल गांधी म्हणाले, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची व्यथा ऐकून घेतली असून एकूण परिस्थितीचा आढावा घेतला आहे. या हत्येसाठी पोलिसच जबाबदार आहेत. पोलिस कोठडीत झालेल्या मारहाणीतच सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला आहे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी विधीमंडळात दिलेली माहितीही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे.

राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही टीका केली. ते म्हणाले, संघाचे संविधानविरोधी धोरणच या घटनांसाठी कारणीभूत आहे. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी व्हावी अशी आमची मागणी असून सूर्यवंशी



कुटुंबाला नक्कीच न्याय मिळेल.

यावेळी काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. ज्यामध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चिन्नीथाल, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विजय वडेवट्टीवार, बाळासाहेब थोरात, खा. वर्षा गायकवाड, श्रीमती यशोमती ठाकूर, खा. प्रणिती शिंदे, खा. संजय जाधव, सुरेश वरपूडकर, माजी आमदार सुरेश दादा देशमुख, आ. डॉ. राहुल पाटील, आ. अमित देशमुख आणि बाळासाहेब देशमुख यांचा समावेश होता.

गांधी यांनी यावेळी सूर्यवंशी कुटुंबीयांचे सांत्वन करताना त्यांना न्याय मिळवून देण्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

## कोपरगाव तालुक्यातील वारी येथील शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा

**कोपरगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील वारी येथील सोमैया विद्यामंदिरमध्ये बाल आनंद मेळावा उत्साहात आणि आनंदाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला.

या मेळाव्यात शाळेतील इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. बाल आनंद मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट मुलांना लहान वयातच व्यावहारिक ज्ञान देण्याचे होते. या उद्देशाने शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध वस्तूंचे स्टॉल उभारले होते.



त्यात बिस्कीट, कॅडबरी, चॉकलेट, कुरकुरे, पॉपकॉर्न, भाजीपाला, फळं आणि खाद्य पदार्थांचे आकर्षक स्टॉल होते. ढोकळा, साबुदाणा वडे, पावभाजी, गुलाबजाम, बासुंदी, इडली सांबर, पाणीपुरी, भेळ, समोसा, बाकरवडी, पोहे, पाववडे, भजे, चहा, कॉफी यांसारख्या विविध पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते. तसेच पालेभाज्यांच्या स्टॉलमध्ये मेथी, पालक, कांदापात, शेवगा, कोथिंबीर इत्यादी भाज्यांची विक्री करण्यात येत होती. शिक्षक व पालक वर्ग विद्यार्थ्यांना प्रतिसाद देत खरेदी करत होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यात मदत झाली. विद्यार्थ्यांनी खरेदी आणि विक्रीचा अनुभव घेत आनंद द्विगुणित केला. या बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळालं आणि त्यांनी खऱ्या अर्थाने या उपक्रमाला उत्साहात साजरा करत आनंदाची अनुभूती घेतली.